# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. २८ मे २०२६

किंमत ४ ₹


## निगडोलीत वृद्ध दाम्पत्याची हत्या

**खोपोली :** खालापूर तालुक्यातील निगडोली या गावात घरात घुसून अज्ञात हल्लेखोरांनी वयोवृद्ध दाम्पत्याची हत्या केल्याची घटना घडली. या घटनेने संपूर्ण खालापूर हादरले असून या हत्येचे कारण मात्र समजू शकले नाही. ही हत्या कधी घडली याबाबत तर्कवितर्क काढले जात आहेत. या घटनेची माहिती मिळताच खालापूर पोलीसासह तपासणी करणारी फॉरेन्सिक लॅबची टीम घटनास्थळी दाखल झाली असून तपासाची चक्रे जलदगतीने फिरू लागली आहेत. खालापूर तालुक्यातील निगडोली या गावात एक चाळीच्या घरात रघुनाथ दत्तू फराट (वय ७५), सुरेखा रघुनाथ फराट (वय ७२) हे दोघेजण वास्तव्यात होते. पान २ वर

## ५० कोटींचे एमडी ड्रग्ज जप्त

**मुंबई :** आग्रीपाड्यातील एका उच्चभ्रू वसाहतीतील एका सदनिकेत चक्क एमडी ड्रग्जचे उत्पादन सुरू असल्याची बाब अमली पदार्थविरोधी पथकाने केलेल्या कारवाईतून उघड झाली. या कारवाईमुळे एमडी हा अत्यंत घातक मात्र सर्वाधिक विकल्या जाणाऱ्या रासायनिक अमली पदार्थाचे उत्पादन कोणीही, कोठेही अगदी सहजरीत्या घेऊ शकते, हे धक्कादायक वास्तव समोर आले. या कारवाईत मामुनी सरकार या तरुणीसह शोएब मन्सूरी आणि सूफियान मन्सूरी यांना अटक करण्यात आली. अमली पदार्थविरोधी पथकाचे वरिष्ठ निरीक्षक शशिकांत जगदाळे यांना आग्रीपाड्यातील यास्मिन टॉवर या उच्चभ्रू पान २ वर

# बांधकाम परवानग्यांसाठी आता मुंबईच्या फेऱ्या?

| रायगड | प्रतिनिधी |

**बांधकाम परवानगीसाठी अलिबागच्या जिल्हाधिकारी कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना आता एमएमआरडीएच्या कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागणार आहेत. नगर विकास विभागाने शासन निर्णय जारी करीत रायगड जिल्ह्यातील ७४ गावांचा एमएमआरडीए झोनमध्ये समावेश केला आहे. या निर्णयानुसारर अलिबाग तालुक्यातील २२ तर कर्जत तालुक्यातील ५२ गावे एमएमआरडीए क्षेत्रात समाविष्ट झाली आहेत. या ७४ गावांच्या परिसर विकासाच्या नियोजनाचे सर्वाधिकार आता मुंबई महानगर प्रदेश विकास प्रधिकरणाकडे देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे अलिबाग आणि कर्जत तालुक्यातील नागरिकांना एमएमआरडीएच्या कार्यालयात बांधकाम परवानगीसाठी प्रस्ताव सादर करावे लागणार आहेत.** पान २ वर

> बांधकाम परवानगीची प्रक्रिया सुलभ करण्याऐवजी नागरिकांना एमएमआरडीएच्या दारात उभं करणं म्हणजे वेळ, पैसा आणि मानसिक त्रास वाढविण्यासारखं आहे. स्थानिक यंत्रणा उभी न करता अधिकारांचे केंद्रीकरण करणे हा विकासाचा नव्हे, तर नागरिकांच्या गैरसोयीचा मार्ग आहे. रायगडमधील नागरिकांना स्वतःच्या कामासाठी दूरची धावपळ करावी लागणार असेल, तर ही व्यवस्था पुनर्विचाराची गरज आहे. एमएमआरडीएकडे अधिकार देण्यापूर्वी स्थानिक सुविधा आणि यंत्रणा उपलब्ध करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातून सहज होणारी प्रक्रिया दूर नेल्याने सामान्य नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. त्यामुळे या निर्णयाचा विचार करण्याची गरज आहे.
>
> – चित्रलेखा पाटील, शेकाप प्रवक्त्या




## वेधक

### ६१.४५ लाखांची फसवणूक

**नवी मुंबई :** भारती ॲक्सा जीवन विमा पॉलिसी बंद करण्याच्या नावाखाली नागरिकाची तब्बल ६१ लाखांहून अधिक रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी नवी मुंबई सायबर पोलिसांनी दिल्लीतील जाफराबाद परिसरातून एका आरोपीला अटक केली आहे. या प्रकरणात आंतरराज्यीय सायबर टोळीचा सहभाग असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. दिनांक १ जुलै २०२५ ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत आरोपीने फिर्यादीशी संपर्क साधून स्वतःला विमा कंपनीचा प्रतिनिधी असल्याचे भासवले. पॉलिसी बंद करण्याच्या प्रक्रियेच्या नावाखाली एजंट कोड, बीटीसी कोड, कागदपत्र प्रक्रिया आणि कॅश कन्व्हर्जन अशा विविध बहाण्यांनी वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये पैसे जमा करण्यास प्रवृत्त करण्यात आले.

### सिडकोकडून १० टक्के पाणी कपात

**पनवेल :** धरणांमधील घटता जलसाठा, वाढती उष्णता आणि हवामान विभागाने व्यक्त केलेल्या एल-निनो व आयओडीच्या संभाव्य परिणामांच्या पार्श्वभूमीवर सिडको प्रशासनाने आपल्या पाणीपुरवठा क्षेत्रात १० टक्के पाणी कपात लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. ही कपात गुरुवार (दि.२८) पासून लागू होणार असून पुढील आदेशापर्यंत कायम राहणार आहे. सिडको क्षेत्राला हेटवणे धरण, मोरबे धरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे बारवी धरण तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या पाताळगंगा धरणातून पाणीपुरवठा केला जातो. मात्र सध्या उन्हाळ्याची तीव्रता वाढल्याने जलाशयांतील पाण्याची बाष्पीभवन वाढत असून उपयुक्त जलसाठा झपाट्याने पान २ वर

### तमिळनाडूच्या राजकारणात यू-टर्न


**चेन्नई :** गेल्या दोन आठवड्यांत तामिळनाडूच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली आहे. एआयएडीएमके पक्षात सुरू झालेले अंतर्गत बंड आता संपुष्टात येत असल्याचे दिसत आहे. पक्षाध्यक्ष ई. पलानीस्वामी यांना विरोध करणारे आणि विधानसभेतील बहुमत चाचणीत विजय कुमार यांच्या नेतृत्वाखालील टीव्हीके सरकारच्या बाजूने मतदान करणारे बंडखोर आमदार आता पक्षात परतले आहेत. शुक्रवारी दोन्ही गटांनी विधानसभा अध्यक्षांची भेट घेऊन पक्ष आता एकसंध असल्याचे आश्वासन दिले. बंडखोर आमदारांनी, आम्ही नेहमीच एकजूट राहू, असे म्हणत पक्षाशी आपली निष्ठा पुन्हा व्यक्त केली.

## शिक्षकांच्या जीवाशी खेळ नको; शेकाप आक्रमक

### शिक्षकांच्या कुटुंबांना दिलासा द्या; आ. बाबासाहेब देशमुखांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

जनगणना कर्तव्यावर असताना निधन झालेल्या शिक्षकांच्या कुटुंबांना आर्थिक मदत करा, अशी मागणी शेकापचे आमदार बाबासाहेब देशमुख यांनी केली आहे. याबाबत मुख्यमंत्री यांना निवेदन दिले असून सांगोल्यासह राज्यातील इतर घटनांचाही गांभीर्याने विचार व्हावा, अशी बाबासाहेब देशमुख यांनी मुख्यमंत्र्यांकडे आग्रही मागणी केली. राष्ट्रीय जनगणना २०२७ चे कर्तव्य बजावत असताना तीव्र उष्माघाताने निधन झालेल्या सांगोला विद्यामंदिर प्रशालेचे आदर्श शिक्षक कै. राजेंद्र दामोदर ढोले यांच्या कुटुंबाला शासनाने तात्काळ आर्थिक मदत द्यावी. केवळ



सांगोलाच नव्हे, तर सध्याच्या भीषण उन्हात कर्तव्य बजावताना राज्यभरात इतरही अनेक ठिकाणी अशा दुर्दैवी घटना घडल्या आहेत. शासनाने या संपूर्ण परिस्थितीचा व्यापक विचार करून राज्यातील सर्वच शिक्षकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न तातडीने निकाली काढावा, अशी आग्रही मागणी सांगोला विधानसभेचे आ. बाबासाहेब देशमुख यांनी केली आहे.

यासंदर्भात आ. देशमुख यांनी मुंबई येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस सयांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना मागण्यांचे सविस्तर निवेदन सुपूर्द केले. या अत्यंत संवेदनशील प्रकरणाबाबत माहिती देताना आमदार बाबासाहेब देशमुख यांनी सांगितले की, कै. राजेंद्र ढोले हे राष्ट्रीय कर्तव्य बजावत असताना उष्माघाताचे बळी ठरले आहेत. त्यांच्या अकाली पान २ वर

## बाळाराम पाटील यांनी घेतली उपोषणकर्त्यांची भेट

- जि.प. शिक्षण विभागाकडून कार्यवाही नाही
- शिक्षण संस्थेच्या कारभाराविरोधात छेडले उपोषण



| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

पनवेल तालुक्यातील एका शिक्षण संस्थेच्या कारभाराविरोधात माजी सरपंच अनिल ढवळे यांनी उपोषण सुरु केले आहे. शेतकरी कामगार पक्षाचे नेते माजी आ. बाळाराम पाटील यांन बुधवारी सकाळी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन त्यांना पाठिंबा दर्शविला.

मिळालेल्या माहितीनुसार, पनवेल तालुक्यातील शिवकर येथील श्री गणपती देवस्थान ट्रस्ट या संस्थेच्या श्री गणपती इंग्लीश मिडीयम स्कूल या संस्थेच्या मुख्य विश्वस्त म्हणून दिलेले हमीपत्र हे खोटे व बनावट आहे. त्यांच्याविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा असा आरोप करीत पनवेलमधील शिवकर येथील अनिल ढवळे यांनी अलिबागमध्ये माध्यमिक शिक्षण अधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरु केले. सोमवार (दि.२५) पासून हे उपोषण सुरू आहे. या उपोषणाला तीन दिवस झाले आहेत. मात्र अद्यापर्यंत जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागाकडून कोणतीही कार्यवाही केली नाही. अनिल ढवळे हे गेल्या तीन दिवसांपासून उपोषणाला बसले आहेत. ही बाब शेकापचे नेते माजी आ. बाळाराम पाटील यांच्या लक्षात आली. त्यांनी बुधवारी सकाळी अलिबागमध्ये जाऊन उपोषणकर्ते ढवळे यांची भेट घेतली.

## पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष

### एमआयडीसीकडून पाणी देण्यास टाळाटाळ



| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |


रायगड जिल्ह्यातील महादेवखार आणि महाळुंगेमध्ये पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. महिन्याभरापासून एमआयडीसीकडून पाणी पुरवठा करण्यास टाळाटाळ झाली आहे. त्याचा परिणाम येथील नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. पाण्यासाठी गेल्या अनेक दिवसांपासून संघर्ष सुरु आहे. त्यामुळे संतप्त ग्रामस्थांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयात कार्यालयात जाऊन निवेदन दिले आहे. पाणी मिळाले नाही, तर तीव्र आंदोलन केले जाईल अशा इशारा देण्यात आला आहे.

ग्रामस्थांकडून मिळालेल्या माहितीनुसार, महादेव महाळुंगे या गावांतील विहिरीच्या पाण्याची पातळी कमी झाली आहे. विंधन विहिरीद्वारेदेखील मुबलक पाणीपुरवठा होत नाही. त्यामुळे या गावांतील नागरिकांना विशेष करून महिलांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. बिरला कंपनीमार्फत दर पान २ वर

## नीट पेपरफुटी प्रकरणात तेरावी अटक

| पुणे | प्रतिनिधी |

देशभर गाजत असलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणात केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने (सीबीआय) पुण्यातील खासगी नीट मार्गदर्शन वर्गातील शिक्षक हर्षद शहा, तसेच लातूरमधील डॉ. मनोज शिरुरे यांना अटक केली. नीट पेपरफुटी प्रकरणातील मुख्य सूत्रधार प्रा. पी. व्ही. कुलकर्णी याला अटक करण्यात आली होती. लातूरमधील डॉ. मनोज शिरुरे यांनी कुलकर्णी यांच्याकडून रसायनशास्त्राचे प्रश्न मिळविले होते. डॉ. शिरुरे यांची या प्रकरणात सीबीआयकडून चौकशी करण्यात आली होती. त्यानंतर डॉ. शिरुरे यांना सीबीआयने अटक केली. नीट पेपरफुटी प्रकरणात आतापर्यंत १३ जणांना अटक करण्यात आली.




पीएनपी कलाविकास मंडळाचा उपक्रम | रसिक प्रेक्षकांकडून चित्रलेखा पाटील यांचे अभिनंदन

## ग्रामीण रंगभूमीला नवसंजीवनी देणारा नाट्य महोत्सव

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

अलिबाग येथे आयोजित नाट्यप्रभा या ग्रामीण नाट्य महोत्सवाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, ग्रामीण कलाकारांना व्यासपीठ देणारा हा उपक्रम कौतुकास पात्र ठरत आहे. डिजिटल युगात ग्रामीण नाट्यपरंपरा जपणे हे मोठं सांस्कृतिक कार्य आहे. महोत्सवात सामाजिक, कौटुंबिक, भक्तीमय आणि विनोदी नाटकांचा संगम पाहायला मिळाला. ग्रामीण संस्कृती, भाषेचा गोडवा आणि अभिनयातील प्रामाणिकपणा प्रेक्षकांना भावला. अनेक ज्येष्ठ नाट्यप्रेमींनी पूर्वी गावोगावी रंगणारी नाटकं पुन्हा जिवंत झाल्याची भावना या महोत्सवामुळे निर्माण झाली, असल्याचे मत दिपक पाटील यांनी व्यक्त केले.

> नाट्यप्रभा २०२६ ग्रामीण नाट्य महोत्सवामुळे अलिबागमध्ये पुन्हा एकदा नाटकांचं सुंदर वातावरण निर्माण झालं. गावागावातील कलाकारांना मोठ्या रंगमंचावर काम करण्याची संधी मिळाली, ही खूप आनंदाची गोष्ट आहे. आजच्या डिजिटल युगात ग्रामीण रंगभूमी जिवंत ठेवणं सोपं नाही. पण पीएनपी कलाविकास मंडळाने घेतलेल्या या उपक्रमामुळे अनेक कलाकारांना नवी दिशा आणि आत्मविश्वास मिळाला आहे. प्रत्येक नाटकामध्ये ग्रामीण मातीचा सुगंध आणि कलाकारांची मेहनत स्पष्टपणे जाणवत होती. विशेष म्हणजे चित्रलेखा ताई म्हणजेच आमच्या लाडक्या चिऊताई यांनी ग्रामीण कलाकारांवर ठेवलेला विश्वास आणि दिलेलं पाठबळ खूप मोठं आहे. त्यांच्या प्रोत्साहनामुळेच हा महोत्सव इतक्या सुंदर पद्धतीने उभा राहिला. हा महोत्सव पुढील वर्षी आणखी मोठ्या स्वरूपात व्हावा आणि ग्रामीण रंगभूमीचा हा दीप असाच तेवत राहावा, हीच मनापासून इच्छा.
>
> –अनिल पाटील

### ग्रामीण संस्कृतीचा जिवंत उत्सव : साक्षी नाईक

नाट्यप्रभा पाहताना पुन्हा गावाकडची रंगभूमी जगल्यासारखं वाटलं.ग्रामीण नाट्य महोत्सव पाहताना मन खरंच भरून आलं. आजच्या मोबाईल आणि डिजिटल युगात गावोगावीची नाट्यपरंपरा पुन्हा इतक्या उत्साहात जिवंत झालेली पाहणं ही खूप मोठी आनंदाची गोष्ट आहे. अलिबागमध्ये पीएनपी कलाविकास मंडळाने उभा केलेला हा नाट्यमहोत्सव केवळ कार्यक्रम नाही, तर ग्रामीण संस्कृतीचा जिवंत उत्सव आहे असं मला वाटतं. या महोत्सवात सहभागी झालेल्या कलाकारांच्या अभिनयात एक प्रामाणिकपणा जाणवला. त्यांच्या संवादांमध्ये गावाकडची माती होती, भावना होत्या आणि नात्यांचा गोडवा होता. प्रत्येक नाटक संपल्यानंतर मिळणाऱ्या टाळ्या या केवळ कौतुकाच्या नव्हत्या, तर त्या ग्रामीण रंगभूमीवरच्या प्रेमाच्या होत्या. गावोगावी जत्रांमध्ये, उत्सवांमध्ये नाटकं व्हायची. संपूर्ण गाव एकत्र बसून नाटक पाहायचं. तीच भावना या महोत्सवामुळे पुन्हा अनुभवायला मिळाली. नवोदित कलाकारांनाही इतक्या मोठ्या रंगमंचावर उभं राहण्याची संधी मिळाली, ही खूप महत्त्वाची गोष्ट आहे. पीएनपी कलाविकास मंडळाने हा उपक्रम राबवून केवळ नाटकं सादर केली नाहीत, तर अनेक कलाकारांना नवी ओळख आणि नवा आत्मविश्वास दिला आहे. आजच्या काळात जिवंत रंगभूमी टिकवणं पान २ वर

# भीक मागण्यासाठी अल्पवयीन मुले टार्गेट

## खारघर रेल्वे स्थानक परिसरात उच्छाद

**। पनवेल ग्रामीण । वार्ताहर ।**

हार्बर मार्गांवरील खारघर रेल्वे स्थानकातून दररोज हजारो प्रवाशी ये-जा करत असतात. मोठ्या प्रमाणात रहदारी असलेल्या या परिसरात अल्पवयीन मुलांकडून भीक मागवण्याचे प्रकार वाढत असून नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानकाबाहेरील खाद्यपदार्थांच्या स्टॉल परिसरात ही मुले दिवसभर फिरत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

विशेष म्हणजे, स्टॉलवर खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांकडे पैसे मागणे, सतत मागे लागणे तसेच त्रासदायक वर्तन करणे असे प्रकार सर्रास घडत आहेत. यामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. खारघर परिसरात अनेक शैक्षणिक संस्था व महाविद्यालये असल्याने दररोज मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांची वर्दळ रेल्वे स्थानकात असते मात्र, स्थानक परिसरातील वाढत्या भिकाऱ्यांच्या त्रासामुळे विद्यार्थिनींमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक वेळा अल्पवयीन मुलांना पुढे करून भीक मागवली जात असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे.स्थानिकांनी प्रशासन आणि रेल्वे पोलिसांनी या प्रकाराकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच अल्पवयीन मुलांचा वापर करून भीक मागवणाऱ्या टोळ्यांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

धक्कादायक प्रकार म्हणजे एकच बाळ, पण भीक मागणाऱ्या महिला मात्र वेगवेगळ्या असल्याचे समोर आले आहे. खारघर रेल्वे स्थानक परिसरात भीक मागण्याचा अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक प्रकार समोर आला आहे.

स्थानकात प्रवेश करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मुख्य मार्गात एका लहान बाळाला झोपवून त्याच्या नावाखाली भीक मागितली जात असल्याचे दिसून येत आहे. मात्र, विशेष बाब म्हणजे तेच बाळ दिवसभर त्या ठिकाणी असते, पण भीक मागणाऱ्या महिला मात्र वेळोवेळी बदलत असल्याचे नागरिकांनी निदर्शनास आणले आहे.या प्रकारामुळे अल्पवयीन मुलांचा वापर करून संघटित पद्धतीने भीक मागवली जात असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### प्रवेशद्वारात फेरीवाले

**रेल्वे स्थानकाच्या मुख्य प्रवेशद्वारातच फेरीवाल्यानी आपले बस्थान बसवल्याचे पाहायला मिळत असून, थंड पेय विक्रीसाठी हातगाड्या रेल्वे स्थानकाच्या वास्तुमधेच उभ्या करून व्यवसाय केला जात असल्याचे पाहायला मिळते.**



> **या प्रकाराकडे दुर्लक्ष न करता याचा कायमस्वरूपी बंदोबस्त करण्यासाठी सिडको, रेल्वे पोलीस आणि महापालिका प्रशासनाने प्रयत्न करणे गरजेचे आहे.तसेच या मागे काही अर्थकारण आहे का याचा शोध घेणे गरजेचे आहे.**
> **– मंगेश रनवडे, शिवसेना महानगर संघटक**

## उष्णतेच्या लाटांचा पर्यटनाला फटका

**। रायगड । प्रतिनिधी ।**

वन डे पिकनिकसाठी हॉट डेस्टिनेशन असलेल्या रायगडातील किनाऱ्यांचे जग सध्या काहीसे मुके-मुके झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून उन्हाचा पारा भडकला असल्याने अंगाची लाहीलाही होत असून याचा जबरदस्त फटका पर्यटन व्यवसायाला बसला आहे. ऐतिहासिक गड-किल्ले, समुद्रकिनारे आणि पर्यटनस्थळांवर नेहमी दिसणारी पर्यटकांची तुफान गर्दी यंदा उष्णतेच्या लाटेमुळे कमी झाली असून मे महिन्याच्या सुट्ट्या असतानाही सर्वत्र शुकशुकाट पाहायला मिळत आहे.

सुट्ट्यांच्या काळात किल्ले रायगड, जंजिरा किल्ला यांसारख्या ऐतिहासिक स्थळांवर मोठ्या प्रमाणावर पर्यटकांची गर्दी असते. तसेच अलिबाग, दिवेआगर, नागाव या समुद्रकिनाऱ्यांवरही पर्यटकांची रेलचेल असते. मात्र यंदा वाढत्या तापमानामुळे पर्यटकांनी घराबाहेर पडणे टाळल्याचे दिसून येत आहे.

गेल्या तीन महिन्यांपासून तापमानात सातत्याने वाढ होत असून दुपारच्या वेळेत उकाडा अधिक तीव्र होत आहे. तर समुद्रकिनाऱ्यालगत आर्द्रतेत ६६ ते ७४ टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे, त्यामुळे अंगातून घामाच्या धारा वाहत असल्याने परिणामी ट्रेकिंग, किल्ले आणि समुद्रकिनाऱ्यांवरील पर्यटनावर परिणाम झाला आहे. सर्वाधिक पर्यटकांची संख्या आक्षी, नागाव, रेवदंडा, काशिद, नांदगाव, मुरुड या ठिकाणी असते. एकूण पर्यटकांपैकी ३० टक्के पर्यटक या स्थळांवर असतात. मात्र अलिबाग ते मुरुड यादरम्यानच्या ५० किमी अंतराच्या रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण सुरू आहे. ठिकठिकाणी रस्ते खोदून ठेवलेले असल्याने वाहने चालवणे खूपच कठीण जात आहे. या मार्गावर सतत वाहतूककोंडी झालेली दिसून येते.

# शिरवलीत आढळली ऐतिहासिक बारव अन् शिलालेख

## श्रीमद्रायगिरी प्रतिष्ठानची दहावी बारव संवर्धन मोहीम यशस्वी

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

श्रीमद्रायगिरी प्रतिष्ठानकडून खालापूर तालुक्यातील शिरवली गावात पूर्णपणे मातीखाली गाडलेली ऐतिहासिक बारव शोधून तिचे संवर्धन करण्यात आले. संवर्धन मोहिमेदरम्यान बारवमध्ये एक सुंदर शिलालेख आढळून आला. त्याचे वाचन आणि नोंद करण्यात आली असून या शिलालेखावरून सदर बारव १७०२ साली बांधण्यात आल्याचे समोर आले आहे. तसेच हरिहरेश्वर मंदिरासाठी या बारवची निर्मिती करण्यात आल्याचे समजते. या ऐतिहासिक शोधामुळे प्रतिष्ठानच्या सदस्यांकडून आनंद व्यक्त करण्यात आला.

शिरवली येथील बारव संवर्धन मोहिमेची सांगता भंडारा उधळून, गोंधळ, भक्तीगीते, स्फूर्तिगीते आणि शिवशौर्यगीतांच्या कार्यक्रमाने उत्साहात करण्यात आली. या मोहिमेत ५५ ते ६० पेक्षा अधिक सभासद सहभागी झाले होते.





कामा आधी



शिलालेख

ऐतिहासिक वारसा जपण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या श्रीमद्रायगिरी प्रतिष्ठान परिवाराने रायगड जिल्ह्यातील दहावी बारव संवर्धित करून एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. गेली अनेक वर्षे खोपोली, खालापूर, पनवेल, कर्जत, पेण, पाली परिसरातील गडकोट, ऐतिहासिक मंदिरे, बारव, नवोरगळ, सतीशीला आणि अन्य ऐतिहासिक ठेव्यांचे संवर्धन करण्याचे कार्य प्रतिष्ठानकडून सातत्याने केले जात आहे.

एकविरा देवी, नाशिक आळे फाटा रेडा समाधी, साजगाव, कराडे, मोहोपाडा यांसारख्या ठिकाणी गडदुर्ग, भुईकोट आणि बारवांची डागडुजी व स्वच्छता मोहिमा राबवण्यात आल्या आहेत. प्रतिष्ठानमध्ये दोनशेहून अधिक महिला व पुरुष सदस्य कार्यरत असून सर्वजण नोकरी सांभाळून आठवड्यातील सुट्टीचा दिवस समाजकार्य, स्वच्छता आणि संवर्धन मोहिमांसाठी खर्च करतात. विशेष म्हणजे प्रत्येक सदस्य स्वतःच्या खर्चाने मोहिमेत सहभागी होत असतो.

## आरोग्य शिबिराला उत्तम प्रतिसाद

**उरण :** भूपाळी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित उरण येथे आरोग्य शिबीर राबविण्यात आले. भूपाळीमध्ये वंचित बहुजन आघाडी उरण तालुका उपाध्यक्ष तुषार उत्तम गायकवाड यांच्या प्रयत्नातून मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. उरण क्रोप्रोली सरकारी दवाखाना मार्फत वैद्यकीय चिकित्सा डॉक्टर डॉ. पूजा पाटील यांनी नागरिकांना तपासणी केली आणि औषध उपचार करण्यात आले. सेक्टर १२ द्रोणागिरी नोड रहिवाशी,भूपाळी सोसायटी द्रोणागिरी नवी मुंबई मधील रहिवाशी, भूपाळी सोसायटी द्रोणागिरी नवी मुंबई मधील रहिवाशी, भैरवी सोसायटी रहिवाशी, भूपाळी गृहसंकूल, मल्हार गृहसंकूलमधील रहिवाशांनी महिलांनी वृध्द व्यक्तींनी शिबिराचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला.

# शार्लेट लेकला स्वच्छतेची प्रतीक्षा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान या ८०० मीटर उंचीवर असलेल्या थंड हवेच्या ठिकाणी पाण्याचा तलाव आहे. जंगल भागात असल्याने या तलावात पावसाळ्यातील पाण्याबरोबर दगडमाती साठून राहिले आहेत. २०१३ नंतर शार्लेट लेकमधील गाळ काढण्यात आला नाही आणि त्यामुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेना आक्रमक झाली आहे. दरम्यान २०२४ मध्ये तलावातील गाळ काढण्याची निविदा काढण्यात आली, मात्र तेव्हापासून गाळ काढण्याचे काम रखडलेले आहे.

माथेरान शहरात पिण्याच्या पाण्यासाठी शार्लोट लेक आहे. तेथील पाण्याची साठवण क्षमता जंगलातील गाळ, माती वाहून आल्याने कमी झाली आहे. २०१३ मध्ये या तलावातील गाळ श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानकडून २००० श्री सदस्यांनी श्रमदान करून काढला होता. त्यानंतर एक तप पूर्ण झाले असून




अनेक वर्षे शार्लोट लेकमधील गाळ काढण्याची मागणी होत आहे. त्यासाठी मनसेचे शहर अध्यक्ष कदम यांनी उपोषणदेखील केले. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि माथेरान नगरपरिषदकडून त्याबाबत कोणतीही कार्यवाही होत नव्हती. त्यामुळे माथेरानमधील निसर्ग पर्यटन संस्थेने उपोषण सुरू केल्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला जाग आली आणि २०२४ मध्ये गाळ काढण्याचा निर्णय झाला. शासनाने केंद्र सरकारच्या अमृत २ मधून पाच कोटींची निविदा काढली. माथेरान नगरपरिषदेस राज्य शासनामार्फत राज्य सरोवर संवर्धन योजनेतंर्गत माथेरान येथील शार्लोट तलावास पर्यावरणदृष्ट्या संवर्धन व संरक्षण करण्यासाठीच्या कामाला मंजुरी मिळाली होती. मात्र माथेरान नगरपरिषदेकडून अद्यापही गाळ काढण्यात आलेला नाही. त्यानंतर सलग दोन वर्षे महाराष्ट्र नवनिर्माण सेना पाठपुरावा करीत आहे. मात्र जीवन प्राधिकरण आणि नगरपरिषद यांच्याकडून शार्लोट लेकमधील गाळ काढला गेला नाही. शेवटी मनसेने आक्रमक भूमिका घेत शहर अध्यक्ष संतोष कदम आक्रमक झाले असून त्यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे कार्यकारी अभियंता एस. पी. वेंगुर्लेकर यांची भेट घेतली.

# पान १ वरून

## निगडोलीत वृद्ध दाम्पत्याची हत्या

रघुनाथ फराट हे बँकेतून सेवा निवृत्ती होऊन गावातील घरामध्ये वास्तव्यात होते. सोमवारी रात्री ते झोपले होते. त्यांनतर दुसऱ्या दिवशीही घराचे दरवाजे बंद अवस्थेत होते. परिसर गजबलेला असतानाही हल्लेखोरांनी कोणाला कानोकान खबर न लावता दोघांच्या गळ्यावर आणि अन्य भागांवर सपासप वार करून या दोघांची हत्या केल्याची घटना घडली.

दिवसभरात घर नेहमीच बंद असल्याने या घराकडे कोणाचे लक्षही न गेल्याने मंगळवारी सायंकाळी त्यांचा नातू घराकडे आल्यांनातर घराचे पुढचे दरवाजे बंद होते. घर बंद का आहे त्यामुळे त्याने आरडाओरडा केला. त्यावेळी शेजारी काही मंडळी जमली. त्यांनी दरवाजा उघडला असता रघुनाथ फटाट व दुसऱ्या बाजूला काही अंतरावर सुरेखा फराट दोन्ही वृद्ध रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. या दोघांवर असणाऱ्या खोलवर जखमा पाहून अतिशय निर्दयीपणे धारधार शस्त्रे हल्लेखोरांनी या घटनेत वापरले असल्याचे दिसून आले. या घटनेची माहिती मिळताच मोठ्या प्रमाणात कर्जत, खालापूर तालुक्यातील त्यांचे नातेवाईक, मित्र परिवार जमा झाला होता.

## ५० कोटींचे एमडी ड्रग्ज जप्त

वसाहतीतील एका सदनिकेत एमडीचे उत्पादन सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाली. उपआयुक्त नवनाथ ढवळे यांच्या मार्गदर्शनाखाली जगदाळे आणि पथकाने सदनिकेवर छापा घातला. या वेळी पोलिस पथकाला तब्बल ५०.७४ कोटी रुपयांचे तयार एमडी सापडले. त्यासोबत आवश्यक असलेली रसायने, यंत्रसामग्रीसह देशी बनावटीचे पिस्तूल आणि १९ जिवंत काडतुसे असा शस्त्रसाठा पथकाने जप्त केला.अटक आरोपींना अमली पदार्थनिर्मितीचा अनुभव नाही. तसेच याआधी विक्रीतही त्यांचा सहभाग नव्हता. तपासाशी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार तिघांचेही शिक्षण जेमतेम आहे. यातील शोएब हा प्रमुख आरोपी असून, त्याच्या विरोधात जबरी चोरी, सोनसाखळी चोरी, हाणामारीचे तब्बल २३ गुन्हे नोंद आहेत. त्याला एमडीचे व्यसन होते. मात्र, सेवन करता-करता त्याने थेट या अमली पदार्थाचे उत्पादन सुरू केले.

आजवर राज्यात विविध पोलिस दलांनी अनेक एमडी कारखाने उद्ध्वस्त केले. त्या सर्वच प्रकरणांमध्ये अटक झालेल्यांपैकी किमान एका आरोपीकडे रसायनशास्त्राची पदवी किंवा रसायनांचे आवश्यक ज्ञान आहे. या कारवाईत आरोपींचे शिक्षण आणि निवडलेल्या ठिकाणामुळे एमडीचे उत्पादन कोणीही, कोठेही घेऊ शकते, असे निरीक्षण अधिकाऱ्याने नोंदविले.देशात सुरक्षा यंत्रणांची नजर चुकवून सुरू असलेल्या एखाद्या कारखान्यात शोएबने एमडी उत्पादनाचे धडे घेतले असावे किंवा त्याला कोणीतरी ऑनलाईन माध्यमातून मार्गदर्शन करत असावे, असा अंदाज असून, त्याबाबत अधिक तपास सुरू असल्याचे उपआयुक्त ढवळे यांनी स्पष्ट केले.

## बांधकाम परवानग्यांसाठी आता मुंबईच्या फेऱ्या?

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ४० (१) सीमधील तरतुदीनुसार नेरळ परिसरातील २४ गावे, कर्जत परिसरातील २८ गावे, पोयनाड परिसरातील ११ गावे तर अलिबाग शहरालगत असलेल्या ११ गावांसाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून सर्वाधिकार हे आता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे देण्याचा निर्णय नगर विकास विभागाने परस्पर घेतला आहे. स्थानिकांची मते जाणून न घेता शासनस्तरावर परस्पर हा निर्णय घेण्यात आला आहे. १९ मे २०२६ रोजी याबाबतचा शासन निर्णय जारी झाला आहे.

अलिबाग तालुक्यातील गावांसाठी पूर्वी नियोजन प्राधिकरण म्हणून जिल्हाधिकारी रायगड हे काम पाहत होते. पण नजीकच्या काळात जिल्हाधिकारी रायगड यांचे नियोजन प्राधिकरण म्हणून असलेले अधिकार काढून ही गावे सिडकोच्या ताब्यात देण्यात आली होती. आता सिडकोच्या ताब्यातील ही गावे काढून एमएमआरडीएकडे देण्यात आली आहेत. तर एमएमआरडीएला या गावांसाठी नियोजन विकास आराखडा तयार करण्याचे आदेश नगर विकास विभागाने दिले आहेत. एमएमआरडीए जोवर नवीन आराखडा तयार करून मंजूर करत नाही तोवर युडीसिपीआरचा विद्यमान आराखडा आणि नियम लागू राहणार आहेत.अलिबाग शहरालगतची चेंढरे, वरसोली, गोंधळपाडा, वेश्वी, थळ, वायशेत, खंडाळे, नेहुली, मुळे, बामणोली आणि लोणारे तर पोयनाड परीसरातील पेझारी, दिवलांग, पोयनाड, आंबेपूर, शाहाबाज, वाळवडे, घसवड ही गावे सिडकोकडून आता एमएमआरडीएकडे हस्तांतरीत केली जाणार आहेत. हा निर्णय घेताना स्थानिकांना विश्वासात घेण्याची तसदीही घेण्यात आली नसल्याचा आरोप आता केला जाऊ लागला आहे. त्यामुळे स्थानिकांना बांधकाम परवानग्या आणि इतर विकास प्रकल्पांच्या मंजूरीसाठी मुंबईतील एमएमआरडीएच्या बांद्रा येथील कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे अलिबागमधील नागरिकांमध्ये नाराजीचा सूर आहे. एमएमआरडीएकडे बांधकामांना मंजुरी देण्यासाठी स्थानिक पातळीवर यंत्रणा उपलब्ध नाही. त्यामुळे बांधकाम परवानगी मिळवण्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. नैना प्रकल्पासाठी ज्यावेळेला सिडकोची नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यावेळी जवळपास पाच वर्ष नैना क्षेत्रात बांधकाम परवानगी मिळण्यात अडचणी येत होत्या. हि बाब लक्षात घेऊन जोवर स्थानिक पातळीवर एमएमआरडीएची स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वित होत नाही. तोवर जिल्हा प्रशासनाकडे बांधकाम परवानग्या अधिकार कायम ठेवण्यात यावे, अशी मागणी केली जात आहे.

## शिक्षकांच्या जीवाशी खेळ नको; शेकाप आक्रमक

निधनामुळे ढोले मळा (सांगोला) येथील त्यांचे कुटुंब संपूर्णपणे उघड्यावर पडले आहे. मात्र, ही समस्या केवळ सांगोला पुरती मर्यादित नसून, सध्या संपूर्ण राज्यात तापमान ४२ ते ४४ अंशांच्या पार गेल्याने जनगणना करणाऱ्या राज्यातील अनेक शिक्षकांना उष्माघाताचा तीव्र त्रास होत आह.काही ठिकाणी शिक्षकांना आपले प्राणही गमवावे लागले आहेत. त्यामुळे शासनाने या सर्व प्रकरणांकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे, असे सांगण्यात आले. सांगोल्यातील पीडित कुटुंबाला तात्काळ मदत. राष्ट्रीय किंवा शासकीय कर्तव्यावर असताना मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या शासकीय नियमाप्रमाणे कै. ढोले यांच्या कुटुंबाला देय असणारी अनुग्रह अनुदान रक्कम विनाविलंब मंजूर करून ती त्वरित अदा करण्यात यावी.

मृत शिक्षक कै. ढोले यांच्या कुटुंबातील पात्र व्यक्तीस प्राधान्य देऊन तातडीने अनुकंपा तत्त्वावर शासकीय सेवेत सामावून घेण्यात यावे. सध्याच्या भीषण उन्हात राज्यातील इतरही भागांत ज्या शिक्षकांवर अशा दुर्दैवी घटना ओढवल्या आहेत, त्या सर्व ठिकाणची माहिती शासनाने तातडीने मागवून घ्यावी आणि त्या सर्व पीडित शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांनाही समान न्याय देऊन आर्थिक व प्रशासकीय दिलासा द्यावा. उन्हाची तीव्र लाट लक्षात घेता जनगणनेच्या क्षेत्रीय कामाच्या वेळेत बदल करण्यात यावा किंवा शिक्षकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या सर्व वैद्यकीय सुविधा तात्काळ उपलब्ध करून द्याव्यात. सुरक्षेसाठी ठोस धोरण स्विकारण्यात यावे, अशी मागणी आ. देशमुख यांनी केली आहे.

## पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष

आठवड्याला अथवा पंधरा दिवसांनी पाणी पुरवठा केला जातो. त्यामुळे या गावांतील नागरिकांना पाण्याची प्रतीक्षा लागून राहिली आहे. गावांना पाणी पुरवठा मुबलक मिळावा, म्हणून २६ गाव योजना राबविण्यात आली. तरीदेखील गावांना पाणी नाही, अशी परिस्थिती निर्माण झाल्याची प्रतिक्रिया ग्रामस्थांकडून व्यक्त करण्यात येत आहे. २६ गाव योजनेमध्ये महादेवखार हे गाव शेवटचे आहे. मात्र अजूनपर्यंत या गावाला पाणी नाही.त्यामुळे या गावांमधील ग्रामस्थांनी ७ मे रोजी संबंधित विभागाच्या कार्यालयात जाऊन अधिकाऱ्यांची भेट घेतली. पाण्याच्या समस्येचे गाऱ्हाणे मांडले.

मात्र तेथील अधिकाऱ्यांनी ही जबाबदारी बिरला कंपनीवर ढकलून आपल्याकडील जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न केला. खारगांवपर्यंत पाणी पुरवठा होतो. नवीन कनेक्शनसाठी बिरला कंपनीकडून पाण्याची लाईन तोडण्यात आली आहे. त्यामुळे हा पाणी महादेव खारपर्यंत पोहचत नसल्याचे सांगण्यात आले. पाण्याची लाईन जोडण्यात आली आहे.याबाबत चौकशी करून लाईन चालू करून देण्याचे आश्वासन देण्यात आले. परंतु एक महिना होत आला तरीदेखील पाणीपुरवठा करण्यात आला नाही. त्यामुळे संतप्त ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे. पाण्यासाठी गेल्या अनेक दिवसांपासून संघर्ष सुरु आहे.मात्र एमआयडीसीसह अन्य विभागातील अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

## ग्रामीण संस्कृतीचा जिवंत उत्सव : साक्षी नाईक

खूप कठीण आहे. अशा वेळी ग्रामीण रंगभूमीसाठी इतक्या तळमळीने काम करणाऱ्या सर्व नाट्यकर्मींचं मनापासून कौतुक वाटतं.हा महोत्सव पुढील काळात आणखी मोठा व्हावा, अधिक गावांपर्यंत पोहोचावा आणि ग्रामीण कलाकारांना असंच व्यासपीठ मिळत राहावं, हीच अपेक्षा, असे मत साक्षी संतोष नाईक यांनी व्यक्त केले.

## सिडकोकडून १० टक्के पाणी कपात

कमी होत असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. तसेच पावसाळा उशिरा सुरू होण्याची शक्यता लक्षात घेऊन उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

खारघर-सोमवार, तळोजा-शुक्रवार, कळंबोली व नावडे-बुधवार, कामोठे-शुक्रवार, नवीन पनवेल (पूर्व)-सोमवार,नवीन पनवेल (पश्चिम)-मंगळवार, करंजाडे-गुरुवार, काळुंदे-शुक्रवार, उलवे (सेक्टर-२, ३, ५, ६, १९, २९९, २०, २९,२३, गव्हाण गाव व मोरावे गाव)-मंगळवार, उलवे (सेक्टर-८, ०ए, ९, १०वी, १६, १६ए, १५, १७, १८, २४, कोपर, शिवाजी नगर, न्हावा, शेवा व बामणडोंगरी)-शुक्रवार, उलवे (सेक्टर-२५ व २५ए) द्रोणागिरी- रविवार या वेळापत्रकानुसार संबंधित नोड विभागामध्ये पाणीपुरवठा पुन्हा सुरू झाल्यावर काही कालावधीत कमी दाबाने पाणी येण्याची शक्यता आहे. नागरिकांनी याची नोंद घेऊन पाणी वापरताना आवश्यक दक्षता घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

सिडको प्रशासनाकडून सर्व जलस्रोतांतील उपलब्ध साठा, दैनंदिन पाणीपुरवठा आणि स्थानिक वितरण व्यवस्थेचा नियमित आढावा घेण्यात येत असून भविष्यात संभाव्य पाणीटंचाई टाळण्यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून ही पाणी कपात लागू करण्यात आली आहे. हेटवणे, मोरबे आणि इतर धरणांच्या पाणलोट क्षेत्रात समाधानकारक पाऊस होऊन जलसाठ्यात वाढ होईपर्यंत ही कपात कायम राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. याच पार्श्वभूमीवर नवी मुंबई महानगरपालिका, पनवेल महानगरपालिका आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांनीदेखील त्यांच्या कार्यक्षेत्रात पाणी कपातीचे निर्णय घेतले आहेत. सिडको पाणीपुरवठा कार्यक्षेत्रातील सर्व नागरिक, गृहनिर्माण संस्था, व्यापारी संकुले, औद्योगिक व वाणिज्यिक आस्थापना यांनी पाण्याचा वापर अत्यंत काटकसरीने करावा. वाहन धुणे, पिण्यायोगय पाण्याचा अनावश्यक वापर, पाण्याची गळती दुर्लक्षित ठेवणे, साठवण टाक्या ओव्हरफ्लो होणे अशा बाबी टाळाव्यात.जलसंपत्तीचा जबाबदारीने वापर करून पाणीपुरवठा व्यवस्था अधिक काळ सुरुळीत ठेवण्याच्या दृष्टीने नागरिकांनी सिडको प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची मौजे झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकतीचे खाली नमुद मालकांच्या मालकी हक्कांची पडताळणी आम्ही करीत आहोत,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|
| झिराड | १०५ | ०-४५-०० <br> पो.ख. ०-०३-०० <br> एकुण ०-४८-०० | ०.८० | १. अशोक शिवदास आमले <br> २. ममता हेमंत सावंत <br> ३. सुजाता हेमंत सावंत <br> ४. अखिल मधूसूदन सावंत <br> ५. अभिषेक मुकुंद सावंत <br> ६. शशांक मुकुंद सावंत <br> ७. गौरी जयवंत सावंत <br> ८. मंजिरी अजय राणे <br> ९. मानसी अमित कांबळी <br> १०. रसिक जयवंत सावंत |

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांचे निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान नालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे, असे गृहित धरून तसा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग
ता. २८/०५/२०२५

**ॲड. विधान अरविंद पाटील**
'वत्सला' टिळक रोड, स्टेट बँकेसमोर
ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे उमरोली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. गणेश तुकाराम जाधव यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ६० | ३ | ०-१२-४० | ०=२८ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २७/०५/२०२६

**ॲड. महेश मोतीराम घारे**
मु. सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४/९२७१८६९२०२

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत त्याचे मालक १) सरिता राजेश गुप्ता रा. मुंबई ४००१०२ आणि २) सीमा उपाध्याय रा. गोवा, ४०३५०१ यांचेकडून खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

जमीन मिळकतीचे वर्णन:-

मौजे-मोहिली तर्फे वासरे, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड येथील शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रुपये-पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | २२ | १ | ०-०१-०० | ०-१२ |
| २ | २२ | २क | ०-०७-६० | ०-८३ |
| ३ | २२ | ३ | ०-००-२० | ०-०३ |
| ४ | २३ | ४/अ/१ | ०-२३-९० | १-४४ |
| ५ | २३ | ४/अ/२ | ०-०४-६० | ०-२७ |
| ६ | २३ | ४/अ/३ | ०-०८-०० | ०-४८ |
| ७ | २३ | ४/ब/२ | ०-०७-४० | ०-४७ |
| ८ | २२ | २ब | ०-६८-४० | ६-८८ |
| ९ | २२ | ४ | ०-१०-९० | ०-५८ |
| १० | २३ | २ | ०-४१-६० | ४-४९ |
| ११ | २३ | ३ | ०-२८-०० | १-६९ |
| १२ | २९ | २ | ०-१६-४० | १-५६ |
| १३ | २३ | ४/ब/१ | ०-०७-६० | ०-४७ |
| १४ | २८ | ३ | ०-१९-७० | २-१२ |
| १५ | २९ | १/ब | ०-०५-६० | ०-५६ |
| १६ | ३० | ५/अ | ०-०८-५० (रस्त्याचे क्षेत्र) | |
| | | एकूण क्षेत्र | २-५९-४० | |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, कुळवहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, दान, भाडेपट्टा, लिज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशीलांच्या लाभात सोडून दिलेला असून त्यांची आमचे अशीलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सूचना आहे.

दिनांक : २८ मे २०२६

खरेदीदारातर्फे
**ॲड. उत्कर्षा सुरेश सोनावळे**
बीएलएस.,एलएल.बी.
पत्ता : श्री साई सावली अपार्टमेंट,
दुसरा मजला, दिवाणी न्यायालयाजवळ,
विठ्ठल नगर, कर्जत, तालुका-कर्जत,
जिल्हा-रायगड- ४१०२०१.
मोबाईल क्रमांक ९०७५९९५९२८

## निवडक

### बाजारात सुट्ट्या पैशांची चणचण

**कोलाड** : सद्या बाजारपेठेत एक, दोन, पाच रुपयांच्या नाण्यांसह दहा, वीस व पन्नास रुपयांच्या नोटांची चणचण जाणवत आहे. त्यामुळे किरकोळ खरेदी, भाजी बाजार, किराणा दुकाने, बस व रिक्षा भाड्यांसह इतर छोटे मोठे दैनंदिन व्यवहारात ग्राहक व व्यापारी दोघांनाही मोठ्या अडचणीला सामोरे जावे लागत आहे. सध्या ऑनलाईन आर्थिक व्यवहाराचे प्रमाण वाढले असले, तरी ग्रामीण भागात रोख व्यवहार करतांना सुट्ट्यां पैशांची मोठी अडचण निर्माण होत आहे. रोजच्या व्यवहारात एटीएममधून पैसे काढतांना फक्त १००, २००, ५०० रुपयांच्या नोटा येत असल्यामुळे पैसे सुट्टे करणे कठीण होत आहे. त्यातच १० व २० रुपयांच्या नोटा अनेकदा फाटक्या, तुटक्या, चिटकवलेल्या अथवा जीर्ण अवस्थेत असतात. अशा नोटा काही दिवसांनी वापरण्या योग्य राहत नाहीत. त्यामुळे व्यापारी वर्गाला मोठ्या अडचणीला सामोरे जावे लागत असून, अशा नोटा सांभालणे अवघड झाले आहे. त्यामुळे लवकरात लवकर सुट्टे पैसे व्यवहारात उपलब्ध व्हावेत, अशी मागणी व्यापारीवर्ग व ग्राहकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

### लुटारुला विरोध केल्याने हल्ला

**पनवेल** : मोबाईल फोन खेचुन पळून जाणाऱ्या लुटारुला विरोध करणे पनवेलच्या तक्का भागात राहणाऱ्या एका तरुणाला चांगलेच महागात पडले आहे. मोबाईल फोन खेचण्यास विरोध करणाऱ्या तरुणावर लुटारुने हॉटेलबाहेरील शेगडीवर असलेला एका मोठ्या लोखंडी चमच्याने जोरदार हल्ला केल्याचे उघडकीस आले आहे. या हल्ल्यानंतर लुटारु मोबाईल त्याच ठिकाणी टाकून पळून गेला असून, पनवेल शहर पोलीस त्याचा शोध घेत आहेत. या घटनेत लुटारुच्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या तरुणाचे नाव दिवेश अजय यादव (२०) असे असून, तो पनवेल मधील तक्का परिसरात राहण्यास आहे. दिवेश हा तरुण तक्का परिसरातील एस.बी.आय. बँक एटीएमजवळून पायी चालत जात होता. याचवेळी हा प्रकार घडला. दिवेशला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आल्यानंतर पनवेल शहर पोलिसांनी लुटारु विरोधात दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

### मिनिट्रेनच्या वाढीव फेऱ्यांसाठी गाऱ्हाणे

**माथेरान** :माथेरानची शान समजल्या जाणाऱ्या मिनिट्रेनच्या वाढीव फेऱ्यांसाठी नवीन इंजिन उपलब्ध होईपर्यंत येथील पर्यटन खऱ्या अर्थाने बहरू शकत नाही. त्यासाठी लवकरच नवीन इंजिन उपलब्ध व्हावीत. या आशयाचे निवेदन माथेरानचे नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी खासदार श्रीरंग बारणे यांना सुपूर्द केले आहे. बारणे हे मंगळवारी (दि.२६)कर्जत रेल्वे स्थानकाच्या पाहणी दौऱ्यानिमित्त आले होते. त्यावेळी माथेरानच्या ट्रेनचे गाऱ्हाणे नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी खा. बारणे यांना ऐकवले. अमन लॉज ते माथेरान स्टेशन दरम्यान जी शटल सेवा उपलब्ध आहे त्यामध्ये दोन मालवाहू बोग्या असून, एक बोगी प्रथम दर्जा तर दोन बोग्या द्वितीय श्रेणीच्या आहेत. शटल मधून मोठ्या प्रमाणावर पर्यटकांची ये-जा सुरू असते. परंतु, तीस आसनी बोग्यांमध्ये जागेअभावी तिकीट उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे पर्यटकांचा हिरमोड होत आहे. त्यासाठी आणखीन दोन द्वितीय श्रेणीच्या बोग्या लावण्यात याव्यात. अमन लॉजपासून माथेरान स्टेशन पर्यंतचा मार्ग हा अवघड घाटमाथ्यामध्ये येत नाही. या रेल्वेच्या बाजूला टाकलेली खडी सततच्या रहदारीमुळे विस्कळीत होऊन पसरली जाते. त्यासाठी या रेल्वेच्या दुतर्फा पेव्हर ब्लॉक लावून चालण्यायोग्य मार्ग केल्यास सर्वांना सोयीचे ठरू शकते. माथेरानला बांधकाम साहित्य मनुष्यबळाच्या वाहतूक व्यवस्थेमुळे खूपच महाग मिळते. त्यासाठी नेरळहून पूर्वी मालगाडी सुरू होती ती पुन्हा एकदा सुरू करण्यात यावी. जेणेकरून सर्वसामान्य लोकांना स्वस्तात सामान उपलब्ध होऊ शकते, असेही चंद्रकांत चौधरी यांनी निवेदनात नमूद केले आहे.

### मान्सूनपूर्व कामांच्या आढाव्याची मागणी

पनवेल : पावसाळा सुरू होण्यापूर्वी शहर व ग्रामीण भागात वीज खंडित होण्याच्या घटना वाढत असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी कामगार पक्षाचे चिटणीस नगरसेवक प्रकाश म्हात्रे यांनी एमएसईडीसीच्या कार्यकारी अभियंत्यांना पत्र देत पावसाळापूर्वी करण्यात आलेल्या



उपाययोजनांचा आढावा घेण्याची मागणी केली आहे. पनवेल तालुक्यातील विविध भागांमध्ये पावसाळ्यात झाडांच्या फांद्या, विद्युत खांबांची पाहणी, डीपीची तपासणी इत्यादी कामे केली जातात. मात्र, याबाबतची माहिती नागरिकांना मिळत नसल्याने वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर नागरिकांना उत्तर देताना अडचणी निर्माण होत असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. तसेच, आपत्कालीन परिस्थितीत संपर्कासाठी संबंधित अधिकाऱ्यांचे मोबाईल क्रमांक, वीज पुरवठा खंडित झाल्यास तक्रार नोंदविण्याची व्यवस्था आणि विभागाने केलेल्या उपाययोजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत संयुक्त बैठक आयोजित करावी, जेणेकरून लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि नागरिक यांच्यात समन्वय वाढून नागरिकांना चांगली सेवा मिळेल, अशी अपेक्षा नगरसेवक म्हात्रे यांनी व्यक्त केली आहे.

# नेरळमधील नळजोडणी गैरव्यवहार कायम

## ग्रामपंचायत अधिकारी, कर्मचाऱ्यावर कारवाईची मागणी

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील नेरळ ग्रामपंचायतीतील प्रशासक राजवटीत भ्रष्टाचार वाढतच आहे. लोकनियुक्त जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सदस्य यांच्याकडून तब्बल ४३ अवैद्य नळजोडण्यांचा गैरव्यवहार उघड झाल्यानंतर देखील पाणी पुरवठा विभाग सुधारण्याचे नाव घेत नाही. कर्जत पंचायत समितीचे सदस्य भगवान चंचे यांनी आणखी एक नळजोडणी उघडकीस आणली असून, त्याबाबत ग्रामपंचायत अधिकारी आणि कर्मचाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, गटविकास अधिकारी यांनी ग्रामपंचायत अधिकारी अरुण कार्ले यांच्यावर नियमानुसार कार्यवाही व्हावी, असे आदेश दिले आहेत. त्यामुळे या अवैध नळजोडणी प्रकरणी गटविकास अधिकारी कोणती कारवाई करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मागील तीन-चार महिन्यांत नेरळ ग्रामपंचायतीमध्ये असलेल्या प्रशासक राजवटीत अवैध नळजोडणी करण्याचे अनेक प्रकार उघडकीस आले आहेत. तसेच, ५ लाखांच्या कचरा कुंड्या लपवून ठेवण्याचा प्रकार देखील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या सदस्यांनी उघडकीस आणल्या आहेत. त्यात मागील तीन महिन्यांत तब्बल ४३ नळजोडण्यांची कोणतीही नोंद नसल्याने त्या नळजोडण्या कापून टाकण्यात आल्या आहेत. त्यानंतर देखील नेरळ ग्रामपंचायतीतील कर्मचारी आणि ग्रामपंचायत



अधिकारी यांच्या कार्यपद्धतीत सुधारणा होत नसल्याने नेरळ ग्रामपंचायत ही भ्रष्टाचाराचे कुरण बनले असल्याचे सिद्ध झाले आहे.

नुकताच कर्जत पंचायत समितीच्या सदस्यांनी पाणी पुरवठा विभागाचा आणखी एक प्रताप समोर आणला आहे. या विभागाच्या कर्मचाऱ्यांनी कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता ३५ हजार रुपयांच्या आमिषावर नळजोडणी दिली होती. ती नळजोडणी देताना नेरळ ग्रामपंचायतीची पाणी जोडणी मंजुरी देखील नसल्याची माहिती मिळताच कर्जत पंचायत समितीचे सदस्य भगवान चंचे यांनी ग्रामपंचायत कार्यालय गाठले. संबंधित नळजोडणी बाबत चंचे यांनी ग्रामपंचायत अधिकारी अरुण कार्ले यांच्याकडे परवाना पत्राची मागणी केली. मात्र, कोणत्याही प्रकारचे परवाना पत्र नसताना आणि ग्रामपंचायत पाणी पुरवठा विभागात त्या नळजोडणीची नोंद नसल्याने तत्काळ संबंधित नळजोडणी कापण्यास सांगितले. तसेच, ग्रामपंचायत अधिकारी अरुण कार्ले यांनी पाणी पुरवठा कर्मचाऱ्यावर कारवाई करावी, अशी मागणी देखील केली.

परंतु, कोणतीही कारवाई केली जात नसल्याने भगवान चंचे हे कर्जत पंचायत समितीमध्ये पोहचले आणि गट विकास अधिकारी सुशांत पाटील यांची भेट घेतली. या भेटीप्रसंगी जिल्हा परिषद सदस्य सुनीता मोरे, तसेच राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे पक्षाचे कार्यकर्ते हे देखील उपस्थित होते. यावेळी भगवान चंचे यांनी, प्रशासक सुजित धनगर आणि ग्रामपंचायत अधिकारी अरुण कार्ले यांच्या बाबत गटविकास अधिकाऱ्यांनी अवैध नळजोडणी प्रकरणी कारवाई करण्याची मागणी केली.गटविकास अधिकारी यांनी नियमानुसार कारवाई करण्यात येईल असे आश्वासन दिले असून, मागील दोन महिन्यांपूर्वी उघडकीस आलेला ४३ नळजोडणीच्या भ्रष्टाचाराबाबत कधी कारवाई करणार, असा सवाल भगवान चंचे यांनी उपस्थित केला आहे.

## श्रीवर्धनच्या समुद्रकिनाऱ्यावर हायटेक सुविधा

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्याची ओळख आता अधिक आधुनिक आणि स्वच्छ पर्यटनस्थळ म्हणून होणार आहे. किनाऱ्यावर येणाऱ्या पर्यटकांची वाढती संख्या आणि त्यामुळे निर्माण होणारा स्वच्छतेचा प्रश्न लक्षात घेऊन, श्रीवर्धन नगरपरिषदेने स्मार्ट पाऊल उचलले आहे. किनाऱ्यावरील बंधाऱ्यालगत दोन अत्याधुनिक ई-शौचालये कार्यान्वित करण्यात आली असून, त्यामुळे पर्यटकांची मोठी गैरसोय दूर होणार आहे.

श्रीवर्धनला दरवर्षी लाखो पर्यटक भेट देत असतात. मात्र, समुद्रकिनाऱ्यावर पुरेशा सार्वजनिक स्वच्छतागृहांच्या अभावामुळे पर्यटकांची, विशेषतः महिला आणि ज्येष्ठ नागरिकांची मोठी ओढाताण होत होती. ही बाब गांभीर्याने घेत नगरपरिषदेने पूर्णपणे स्वयंचलित आणि हायटेक प्रणालीवर आधारित




ई-शौचालये उभारण्याचा निर्णय घेतला आहे. किनाऱ्यालगतच्या बंधाऱ्यावर ही दोन शौचालये बसवण्यात आली असून, ती वापरासाठी खुली करण्यात आली आहेत. ही शौचालये पूर्णपणे सेन्सर तंत्रज्ञानावर आधारित आहेत. "पैसे भरा आणि वापरा" या तत्त्वावर ती चालणार असून, नाणे टाकल्यानंतरच या शौचालयाचा दरवाजा उघडला जातो. विशेष म्हणजे, वापरकर्त्याने वापर करून बाहेर आल्यानंतर ही शौचालये सेन्सरच्या साहाय्याने आपोआप स्वच्छ होतात. त्यामुळे मानवी हस्तक्षेपाशिवाय ही जागा चोवीस तास स्वच्छ राहण्यास मदत होणार आहे. प्रत्येक शौचालयासाठी ५०० लिटरची स्वतंत्र पाण्याची टाकी बसवण्यात आली आहे. पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी त्यामध्ये हाय-प्रेशर नोझल्स वापरण्यात आले आहेत. ऊर्जेची बचत करण्यासाठी स्मार्ट दिवे आणि एक्झॉस्ट फॅन आहेत, जे दरवाजा उघडताच सुरू होतात आणि वापरानंतर बंद होतात. किनाऱ्याचे सौंदर्य आणि पर्यावरण राखण्यासाठी सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी स्वतंत्र सेफ्टी टँकची व्यवस्था करण्यात आली आहे.

## रक्तदान शिबिराचे आयोजन

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

सध्या सगळीकडे रक्ताचा तुटवडा भासत आहे. त्यावेळी राष्ट्रीय कर्तव्य व सामाजिक जबाबदारी म्हणून निवृत्त पोलीस कल्याणकारी संघटना रायगडच्यावतीने शनिवारी (दि.३०) सकाळी ८.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत अलिबाग येथील पोलीस मुख्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या हस्ते होणार आहे. तरी अलिबाग परिसरातील आजी माजी पोलीस अधिकारी, कर्मचारी, त्यांचे नातेवाईक तसेच जास्तीत जास्त नागरिकांनी देशसेवा म्हणुन मोठ्या प्रमाणात रक्तदान करून हे शिबीर यशस्वी करावे, असे आवाहन अध्यक्ष राजेंद्र कासार व सुदेश पालकर यांनी केले आहे.

## मुलांनी घेतले छायाचित्रणाचे धडे



**| उरण | प्रतिनिधी |**

निसर्गाने नटलेला उरण तालुका औद्योगिक दृष्ट्या महत्वाचा तालुका आहे. येथील नवतरुण विकासाच्या दृष्टीने विविध क्षेत्राचे शिक्षण घेत आहेत. मात्र, आवड असूनही छायाचित्रणाचे प्रशिक्षण घेता येत नव्हते. याचाच सारासार विचार करून, "फोटोग्राफी प्रमोशन ट्रस्ट" यांच्या माध्यमातून आणि जेएनपीए यांच्या सहयोगातून २ दिवसीय कार्याधळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत एकूण ४० विद्यार्थी सहभागी झाले होते.

छायाचित्रणाची आवड प्रत्येकालाच असते असे नाही. मात्र, सध्याच्या मोबाईल युगामध्ये प्रत्येकाच्या हातामध्ये मोबाईल कॅमेरा उपलब्ध असल्याने, प्रत्येकजण या कॅमेऱ्यामध्ये आठवणी संग्रहित करत असतो. तर अनेकजण सध्याच्या सोशलमीडियासाठी फोटो, व्हिडीओ मोबाईल किंवा कॅमेराच्या सहाय्याने तयार करत असतात. मात्र, याबाबतचे तांत्रिक ज्ञान नसल्याने प्रभावी चित्रण करता येतं नाही. अशाच छायाचित्रणाची आवड असणाऱ्या ४० विद्यार्थ्यांना घेऊन उरणमधील "उरण एजयुकेशन सोसायटी" शाळेच्या ऑडिटरियम होलमध्ये दि.२३ आणि २४ मे रोजी कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेमध्ये छायाचित्रणाचा जन्म, छायाचित्रणाची मुख्य मुलसूत्रे, नेसर्गिक प्रकाषाचा वापर याबाबत उपयुक्त माहिती देण्यात आळी.

## विवाहिता बेपत्ता

**पनवेल** : ३८ वर्षीय विवाहित महिला ही कामानिमित्त बाहेर जाते असे सांगुन ती अद्याप घरी न परतलेली नाही. त्यामुळे ती हरविल्याची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. काजल सुभाष सिंग असे या महिलेचे नाव असून ती घोटगाव कोयनावेळी येथील रहिवाशी आहे. तिचा रंग सावळा, उंची ५ फुट, भाषा हींदी अवगत आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी तळोजा पोलीस ठाणे किंवा पोलीस हवालदार गणपत पवार यांच्याशी संपर्क साधण्याचवे आवाहन करण्यात आले आहे.

## उरणमधील स्वच्छतेची समस्या गंभीर

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

उरण शहरातील स्वच्छतेची समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे. शहरातील वार्ड क्रमांक ७ मधील सार्वजनिक स्वच्छतागृह, गटारे आणि परिसरातील अस्वच्छतेमुळे रोगराईची शक्यता बळावली आहे आहे. या गंभीर समस्येवर ठोस उपाययोजना न केल्यास शुक्रवारी (दि.२९) रोजी शहरातील साचलेला कचरा उरण नगरपरिषदेच्या प्रशासन भवनासमोरच टाकण्यात येईल, असा इशारा शिवसेना ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर



यांनी मंगळवारी (दि.२६) उरण नगरपरिषदेला दिला आहे.

उरण शहरातील कोटनाका वार्ड क्रमांक ७ हे महत्त्वाचे व्यापारी केंद्र आहे. या वार्ड मध्येच असलेल्या मासळी मार्केट, भाजी मार्केट आणि इतर विविध दुकाने आहेत. या ठिकाणी दररोज उरण परिसरातील दररोज हजारो नागरिक खरेदी विक्रीसाठी येत असतात. मात्र, या ठिकाणी नागरिकांसाठी असलेल्या सोयी सुविधा अत्यंत अपुऱ्याच आहेत. सार्वजनिक स्वच्छतागृह आणि परिसरात स्वच्छतेअभावी कायम अस्वच्छता पसरलेली असते. मासळी, चिकण, मटणाची दुकाने, भाजी मार्केट व इतर दुकानांमुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर कचरा साठतो. सातत्याने तुंबलेल्या गटारांमुळे घाणपाणी थेट रस्त्यावर पसरते. त्यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी पसरते. परिसरातील पसरणाऱ्या घाणीच्या साम्राज्यामुळे उंदीर, घुशींचा वावरही मोठ्या प्रमाणावर वाढला आहे.उरण नगरपरिषदेच्या निष्क्रिय कारभारामुळे मात्र परिसरात डेंग्यू, मलेरिया, गॅस्ट्रो व इतर साथीच्या आजारांचा प्रादुर्भाव वाढला आहे. दरम्यान, नागरिकांनी ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख नरेश रहाळकर यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी (दि.२६) नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांची भेट घेऊन समस्यांचे निवेदन सादर केले. तसेच, येथील समस्या दोन दिवसांत कायमची सोडविण्यात यावी. अन्यथा शुक्रवारी शहरातील साचलेला कचरा उरण नगरपरिषदेच्या प्रशासन भवनासमोरच टाकण्यात येईल, असा इशारा नरेश रहाळकर यांनी दिला आहे.

# वडवली फाटा येथे पोलिसांची नाकाबंदी

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन तालुक्यातील बोर्ली पंचतन जवळील वडवली फाटा येथे गेल्या काही दिवसांपासून पोलिसांनी विशेष नाकाबंदी सुरू केली आहे. या मोहिमेदरम्यान प्रामुख्याने दुचाकी वाहनधारकांना थांबवून त्यांना हेल्मेट वापरण्याची सक्ती, तसेच सुरक्षिततेचा संदेश दिला जात आहे.

दुचाकी चालवताना हेल्मेट घालणे हा सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत



जुना आणि कायदेशीर नियम आहे. मात्र, ग्रामीण व स्थानिक पातळीवर या नियमाचे पालन होताना दिसत नाही. दुसरीकडे, तालुक्यात अपघातांचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. विशेषतः दिवेआगर, श्रीवर्धन आणि म्हसळा मार्गावर अनेक तरुण अत्यंत वेगाने दुचाकी चालवत असल्याचे चित्र दिसते. अशा वेगात नियंत्रण सुटल्यास भीषण अपघात होऊन जीव जाण्याचा धोका असतो. हेच वाढते अपघात रोखण्यासाठी पोलिसांनी आता वडवली फाटा येथे कडक नाकाबंदी सुरू केली आहे. श्रीवर्धन आणि म्हसळा बाजूकडे जाणाऱ्या प्रत्येक दुचाकीस्वाराची चौकशी केली जात असून त्यांना हेल्मेटचे महत्त्व पटवून दिले जात आहे. पोलिसांनी सुरू केलेल्या या अचानक तपासणीमुळे वाहनधारकांमध्ये उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे. नाकाबंदी दरम्यान हेल्मेट नसलेल्या चालकांना थांबवले जात असल्याने, पोलिसांनी दंडात्मक पावती फाडली का? असे प्रश्न नागरिकांमधून उपस्थित केले जात आहेत.

## कर्जत पंचायत समितीचे फाटके छप्पर



**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्याचे पंचायत समितीचे कार्यालय असलेल्या ठिकाणी गटविकास अधिकारी, सभापती तसेच उपसभापती यांची दालने सुशोभित करण्यात आली आहेत. तर, छत्रपती शिवाजी महाराज आणि क्रांतिकारकांच्या मूर्ती असलेली दालने अडगळीत असून, त्यांच्या डोक्यावरील छप्पर फाटले आहे. दरम्यान, या प्रकरणात पोलीस मित्र संघटनेने उडी घेतली असून, जुलै महिन्यापर्यंत महापुरुषांचे दालन सुशोभित झाले नाहीतर उपोषणासोबतच कार्यकर्ते मिळून ते दालन सुशोभित करू, असा इशारा दिला आहे.

छत्रपती शिवाजी महाराज, हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांच्या स्मृती कायम राहाव्यात यासाठी कर्जत पंचायत समितीच्या जुन्या इमारतीत त्यांच्या मूर्ती बसवण्यात आल्या आहेत. नवीन इमारतीत कार्यालय हलवण्यात आले आणि त्यानंतर तब्बल २ वर्षांनी छत्रपती आणि हुतात्मा यांची मूर्ती एका दालनात उभारण्यात आल्या. मात्र, त्यावेळी बनवलेल्या दालनाला कोणत्याही प्रकारचे सुशोभीकरण करण्यात आले नाही. ३ वर्षांनी कर्जत पंचायत समितीमध्ये सदस्य मंडळ अस्तित्वात आले. जानेवारी महिन्यात निवडणुका झाल्या आणि सभापती व उप सभापती यांची दालने त्यांच्या नियुक्तीच्या आधीच सुशोभित झाली. मात्र, त्या तिन्ही दालनाच्या समोर असलेली महापुरुषांचे दालनांचे फाटलेले छप्पर दुरुस्त करण्याचे सत्ताधाऱ्यांना जमले नाही. पोलीस मित्र संघटनेने गटविकास अधिकारी सुशांत पाटील यांच्याकडे महापुरुषांचे दालनांचे दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली. आम्ही पैसे देणगी मधून उभे करू आणि दालन सुशोभित करू असा विचार गटविकास अधिकारी यांच्यासमोर आक्रमकपणे मांडण्यात आला. शेवटी गटविकास अधिकारी पाटील यांनी विधान परिषद निवडणुकीचे आचारसंहिता संपल्यानंतर तत्काळ निविदा काढली जाईल आणि १८ जुलै पूर्वी काम पूर्ण केले जाईल, असे आश्वासन दिले.

### पालीतील इतिहास शिक्षकाचा प्रेरणादायी प्रवास | देवभूमी उत्तराखंड दुचाकीवर गाठले

# "पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष अनुभवाची गरज"

**| सुधागड-पाली | प्रतिनिधी |**

विद्यार्थ्यांना इतिहास, भूगोल, संस्कृती आणि अध्यात्म प्रत्यक्ष अनुभवातून समजावून सांगता यावे, या उद्देशाने पालीतील इतिहास विषयाचे शिक्षक चंद्रशेखर राऊत यांनी तब्बल ४ हजार किलोमीटरचा दुचाकीवरून प्रवास करत देवभूमी उत्तराखंड गाठले. ६ राज्यांतून केलेला हा प्रवास त्यांच्या आयुष्यातील अविस्मरणीय अनुभव ठरला असून, या प्रवासातून त्यांनी विविधतेचे रंग जवळून अनुभवले आहेत.

चंद्रशेखर राऊत यांचा महाराष्ट्रातील पाली येथून सुरू झालेला हा प्रवास गुजरात, राजस्थान, हरियाणा, दिल्ली, उत्तर प्रदेश मार्गे उत्तराखंडपर्यंत पोहोचला. यादरम्यान राजस्थानातील बाडमेर, जोधपूर, जयपूर आणि उदयपूर या ऐतिहासिक शहरांनी त्यांना जणू इतिहासाच्या पानांतच नेऊन ठेवले. भव्य किल्ले, राजवाडे, वाळवंटातील अथांग शांतता, रंगीबेरंगी संस्कृती आणि राजेशाही वैभव अनुभवताना इतिहास शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांना सांगण्यासाठी अनेक जिवंत संदर्भ त्यांनी मनात साठवून ठेवले. जोधपूरचा मेहरानगड किल्ला, जयपूरची ऐतिहासिक वास्तुकला आणि उदयपूरचे सरोवरांचे सौंदर्य यांनी प्रवास अधिक समृद्ध केला. हरियाणा, नोएडा, गुरुग्राम, सोनीपत आणि दिल्ली परिसरातून प्रवास करताना आधुनिक भारताचा बदलता चेहरा त्यांनी अनुभवला. मात्र, या संपूर्ण प्रवासातील सर्वात भावनिक आणि आत्मिक टप्पा



होता तो उत्तराखंडचा. हिमालयाच्या कुशीत वसलेली ऋषिकेश, हरिद्वार, देवप्रयाग, रुद्रप्रयाग, सोनप्रयाग, चोपटा, केदारनाथ, बद्रीनाथ आणि तुंगनाथ ही स्थळे त्यांच्या मनावर कायमची कोरली गेली. हरिद्वार येथे प्रथमच गंगेचे दर्शन घेताना आलेला रोमांच, ऋषिकेशमधील अध्यात्मिक शांतता, देवप्रयाग येथे भागीरथी आणि अलकनंदेच्या संगमाचे अप्रतिम दृश्य, रुद्रप्रयागचा ऐतिहासिक संदर्भ आणि चोपटाचे निसर्गरम्य सौंदर्य यामुळे हा प्रवास अधिक संस्मरणीय ठरला. 'मिनी स्वित्झर्लंड' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चोपटामधील हिरव्यागार दऱ्या, धुक्याने वेढलेले पर्वत आणि हिमालयाचे भव्य दर्शन पाहताना निसर्गाची खरी ताकद जाणवल्याचे त्यांनी सांगितले. केदारनाथ आणि बद्रीनाथ येथे पोहोचताना हिमालयीन घाटरस्त्यांवरील कठीण प्रवास, थंडी, पाऊस आणि अवघड वळणे यांचा सामना करावा लागला. तुंगनाथ मंदिर परिसरातील शांतता आणि हिमालयातील सूर्योदय हा त्यांच्या आयुष्यातील सर्वात सुंदर क्षणांपैकी एक ठरला.

> **"हा प्रवास फक्त किलोमीटरचा नव्हता; तो स्वतःला ओळखण्याचा प्रवास होता. रस्ते संयम शिकवत होते, डोंगर संघर्ष शिकवत होते आणि प्रत्येक नवीन माणूस माणुसकी शिकवत होता. विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबर प्रत्यक्ष अनुभवातून इतिहास आणि भूगोल समजावून सांगण्यासाठी अशा प्रवासांची गरज आहे.**
> **- चंद्रशेखर राऊत, इतिहास शिक्षक, पाली"**

# उन्हाळ्याचा धोक्याचा इशारा

पर्यावरण हा खूप जड शब्द आहे. तो वाचला की पुढचा मजकूर अनेक लोक वाचणारच नाहीत किंवा हे काहीतरी ठराविक आहे असे म्हणून बाजूला सारतील अशी स्थिती आहे. पण उन्हाळ्याचा भीषण ताप, पावसाचा वाढता लहरीपणा, यंदा कडक थंडीनंतरच्या विचित्र हवामानामुळे आंब्याचे झालेले नुकसान, नारळावर कधी नव्हे अशी पडणारी कीड हे सगळे पर्यावरणाशी संबंधितच प्रश्न आहेत. यंदा सर्वत्र जाणवलेला भयानक उन्हाळा हाही त्याचाच भाग आहे. किंबहुना, आपल्या दारावर निसर्गाने दिलेली ही इशाऱ्याची थाप आहे. दुर्दैवाने आपण युध्द, पेपरफुटी, अदानीच्या नव्या भानगडी यामध्ये इतके आरपार बुडालेले आहोत की पर्यावरणाच्या प्रश्नांवर विचार करायला आपल्याला शक्तीच उरत नाही अशी अवस्था आहे. उन्हाळ्याचे सरासरी तापमान झपाट्याने वाढत आहे. पूर्वीदेखील शहरे वाढत होती व वाहनांचे प्रदूषण वगैरेंमुळे उन्हाळा जाणवत होता. पण आता त्याचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. यंदा जगातील सर्वात उष्ण शहरांमध्ये भारतातल्या २२ शहरांचा समावेश असल्याचे जाहीर झाले. राजस्थानात चुरू, सिकर वगैरेंमध्ये ४५, ४७ अंश सेल्सिअस तापमान असणे ही आम बात झाली आहे. महाराष्ट्रात चंद्रपूर, अकोला या ठिकाणी हीच अवस्था आहे. ब्रह्मपुरीमध्ये तर अनेक दिवस ४७.४ अंश सेल्सिअस तापमान होते. पूर्वी समुद्रालगत असलेल्या मुंबईत किंवा कोकणपट्टीत ३४ किंवा ३५ च्या वर सहसा तापमान जात नसे. आता अनेक भागात सर्रास ३८ ते ३९ अंश सेल्सिअसची नोंद होऊ लागली आहे. या उन्हाळ्याच्या हंगामातील तापमानातील वाढ आश्चर्यकारक नाही. मात्र ज्या गतीने ती वाढत आहे आणि त्याचा जो परिणाम होत आहे तो अतिशय चिंताजनक आहे. पूर्वी उष्णतेच्या लाटा एका हंगाम ात केवळ दोनवेळा येत होत्या. पण आता त्या चार वेळा येत आहेत. सिमेंटचे रस्ते, जिकडेतिकडे उभे राहत असलेले इमारतींचे जंगल, तुटणारी झाडे यांचा हा एकत्रित परिणाम आहे. मुंबईपुणे एक्स्प्रेसवेच्या निमित्ताने डोंगर फोडण्यात आले. त्यासाठी वापरल्या गेलेल्या आधुनिक तंत्रज्ञानाची जाहिरात करण्यात आली. पण तिथे नवीन झाडे लावली गेली नाहीत. झाडे लावण्यासाठी किंवा ती वाढवण्यासाठी नवीन तंत्रज्ञान वापरले गेले नाही.

### सरकारची जबाबदारी

समृध्दीसारखे मार्ग उभे राहिले. त्यावरून १५० किलोमीटर ताशी वेगाने गाड्या हाकण्याची सोय झाली. पण या गाड्या बंद पडल्या तर उभे राहण्यासाठी एक सावलीचे झाड शेकडो मैल परिसरात शिल्लक उरलेले नाही. मुंबई ते गोवा महामार्गाची अवस्थाही हीच होणार आहे. खुद्द महामार्गाच्या लगत एकही झाड राहू नये असाच बंदोबस्त झाला आहे. उद्या शक्तिपीठ उभारला गेलाच तर तिथेही हेच होण्याची शक्यता आहे. या रस्त्यांसाठी ओतले जाणारे हजारो टन सिमेंट आणि तिथे निघणारा वाहनांचा धूर इत्यादींमुळे वातावरणातला ताप आणखी वाढत असतो. नाशिकमध्ये कुंभमेळा भरवण्यासाठी शेकडो झाडे तुटणार होती. सरकारी यंत्रणा अत्यंत निर्बुध्दपणे व क्रूरपणे असे नियोजन करते. झाडे तुटणे म्हणजे एखादे टेबल किंवा फाईल इकडून तिकडे हलवण्यासारखेच त्यांना बहुदा वाटत असावे. ही बाबू मंडळी आणि राजकीय नेते स्वतः एसी कार्यालयांमध्ये बसून असले नियोजन करतात. एसी गाड्यांमधून हिंडतात. मुलांना परदेशात पाठवतात. तिकडे अमेरिकेने कशी जंगले जपली आहेत यावर ते इकडे भरभरून बोलतात. पण इकडे भारतातल्या निसर्गाची मात्र बिनदिक्कत वाट लावतात. पुण्यात मुळा व मुठा नदीचे सौंदर्यीकरण करण्याच्या नावाखाली तिथे सिमेंटचे रस्ते बांधले जात आहेत. त्याला रिव्हरफ्रंट असे नाव दिले जाणार आहे. यामध्ये नद्यांच्या आसपासची झाडे आणि पर्यावरण नष्ट होणार आहे. पावसाळ्यात पाणी जमिनीत मुरण्याची व्यवस्था कायमची बंद होणार आहे. हेच कमीअधिक फरकाने सर्वत्र चालू आहे. या सर्वांचा परिणाम ऋतू बदलण्यात, उन्हाळ्याचा ताप वाढण्यात, पाऊस कमी होण्यात होत आहे हे लक्षात घ्यायला हवे. यामुळे आपल्या मुलांच्या आयुष्याचे वाळवंट होऊ शकते. यंदाचा पावसाळाही जेमतेम राहील, असा इशारा देण्यात आलेला आहे. एल निनोचा प्रभाव जाणवणार असल्याने यंदा मोसमी पावसाचे पुरेसे ढग निर्माण होणार नाहीत. सुरुवातीला पाऊस ठीक राहिला तरी उत्तरार्धात त्याचे मान कमी होईल अशी शक्यता आहे. तसे झाले तर धरणे कमी भरतील, पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवेल व पुढच्या उन्हाळ्यात बहुदा जागोजागी दुष्काळ पडेल. सध्या सरकार याबाबत इशारा देत आहे. पण त्यासाठी उपाय करणे हे लोकांच्या हातात राहिलेले नाही. सरकारने विकासाच्या नावाखाली निसर्गाची घाऊक प्रमाणात वाट लावायची आणि लोकांनी आपल्या घरात पाणी वाचवून निसर्गाचे रक्षण केल्याचे समाधान मिळवायचे हा या समस्येवरचा उपाय नाही.

### अर्थव्यवस्थेलाही फटका

यंदाच्या उन्हाळ्यामुळे आपल्या औद्योगिक उत्पादनावरही परिणाम होईल असा इशारा संयुक्त राष्ट्रसंघाने दिला आहे. उन्हाळ्यामुळे कामगारांची कार्यक्षमता घटते. मशीन फ्लोअरवर किंवा भट्ट्यांच्या जवळ काम करणे अशक्य ठरते. वारंवार थांबून विश्रांती घेणे, पाणी पिणे अपरिहार्य बनते. हे सर्व काल्पनिक मुद्दे नाहीत. महिंद्रा, जेएसडब्ल्यू किंवा अशाच मोठ्या कंपन्यांनी याची दखल घेऊन उपाय केले आहेत. उन्हाळ्याच्या काळात यापुढे दिवसा रस्त्यावर फिरणे अशक्य झाले तर अर्थव्यवस्थेवर त्याचा गंभीर परिणाम होऊ शकतो. तीव्र उन्हाळ्यामुळे विजेची मागणी कमालीची वाढली असून सर्वत्रच विजेची तूट जाणवत आहे. लोड शेडिंग वाढवावे लागले आहे. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे उत्पादन घटणार आहे. पावसामुळे झालेली हानी स्पष्ट दिसते. त्याची आकडेवारीत गणना करता येते. आजपर्यंत उन्हाच्या त्रासाचे नुकसान मोजले जात नव्हते. इथून पुढे ते मोजावे लागणार आहे अशी स्पष्ट लक्षणे आहेत. यंदा १८८३ सालच्या दुष्काळासारखाच भीषण दुष्काळ पडू शकतो, असाही अंदाज बांधला जात आहे. मात्र, त्या काळाच्या तुलनेत आज आपण अधिक चांगल्याप्रकारे तशा परिस्थितीला तोंड देण्यास तयार आहोत. आपल्याकडे मुबलक अन्नसाठा असल्याने लोकांचे भूकबळी पडणार नाहीत. पण ही स्थिती बिघडत गेली तर आपल्याकडे अन्नधान्याचे साठे तरी शिल्लक राहतील का असा प्रश्न आहे. उष्णतेसोबतच पाण्याची समस्याही अधिक गंभीर होत आहे. पाण्याची पातळी दोनशे तीनशे फुटांपर्यंत खाली जाऊ लागली आहे. मराठवाड्यात तर ती हजार फुटांपर्यंत खाली गेली आहे. बहुसंख्य शहरांना आठवड्यातून एकदा पाणी दिले जात आहे. आपल्याकडे सर्व गर्दी शहरांमध्ये एकवटू लागली आहे. त्यातूनही पाण्याचे प्रश्न बिकट होत आहेत. उन्हाळ्याच्या निमित्ताने त्यांच्या तीव्रतेत वाढ होते. गेल्या वर्षी उशिरापर्यंत पाऊस चालू राहिल्याने यंदा पाण्याची टंचाई आपल्याकडे तुलनेने कमी जाणवली. पण मोसमी पाऊस कमी होणार असेल तर पुढचे सर्व वर्ष पाण्याच्या टंचाईच्या चिंतेमध्ये जाणार आहे. त्याची तयारी आतापासूनच करायला हवी.

विचार

# नाट्यप्रभा : कलाकारांच्या स्वप्नांना भरारी

ज्या रंगभूमीवर दिग्गजांनी गाजवली कला, त्याच रंगभूमीवर उद्याचे तारे घडत आहेत.

'रायगड नाट्यप्रभा' ग्रामीण नाट्य महोत्सवातून ग्रामीण कलाकारांना मिळतेय नवी दिशा; चित्रलेखा पाटील यांचे कार्य प्रेरणादायी ठरत आहे.







संदीप गोठीवरेकर

अलिबाग ही केवळ रायगड जिल्ह्याची प्रशासकीय राजधानी नाही, तर ती एक समृद्ध सांस्कृतिक परंपरेची भूमी आहे. या भूमीने अनेक कलाकारांना घडवले, अनेक कलाविष्कारांना जपले आणि मराठी रंगभूमीच्या वैभवशाली इतिहासात स्वतःचे स्वतंत्र अढळ स्थान निर्माण केले. ज्या रंगमंचावर मराठी रंगभूमीतील अनेक दिग्गज कलाकारांनी आपल्या अभिनयाची अवीट छाप उमटवली, त्याच रंगभूमीवर आज ग्रामीण भागातील नवोदित कलाकार आत्मविश्वासाने उभे राहत आहेत. ही बाब केवळ कौतुकाची नसून मराठी संस्कृतीच्या भविष्यासाठी आश्वासक आहे.

पीएनपी कला विकास मंडळ आयोजित आणि चित्रलेखा ताई पाटील पुरस्कृत ''रायगड नाट्यप्रभा ग्रामीण नाट्य महोत्सव २०२६'' हा केवळ नाट्यस्पर्धेचा मंच नसून ग्रामीण भागातील सुप्त कलागुणांना नवी ओळख देणारा सांस्कृतिक महायज्ञ ठरत आहे. ज्या अलिबागच्या रंगभूमीवर मराठी रंगभूमीतील अनेक दिग्गज कलाकारांनी आपल्या अभिनयाची जादू सादर केली, त्याच रंगभूमीवर आज ग्रामीण भागातील कलाकार आत्मविश्वासाने उभे राहत आहेत. ही केवळ संधी नसून त्यांच्या स्वप्नांना मिळालेली भरारी आहे.

या भव्य नाट्य महोत्सवाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून संपूर्ण रायगड जिल्ह्यातील कलाकारांसाठी हा महोत्सव एक सांस्कृतिक पर्वणी ठरला आहे.

रंगभूमी ही केवळ मनोरंजनाचे साधन नसते; ती समाजमन घडविण्याची ताकद बाळगते. कलाकार आपल्या अभिनयातून समाजातील विविध प्रश्न, नातेसंबंध, संघर्ष, मूल्ये आणि वास्तव मांडत असतो. या महोत्सवात सादर होणाऱ्या विविध सामाजिक, विनोदी आणि आशयघन नाटकांमधून कलाकारांनी आपल्या अभिनयाची ताकद सिद्ध केली आहे. स्पर्धेच्या या युगात केवळ प्रसिद्धीच्या झोतात राहण्यापेक्षा दर्जेदार आणि विचारप्रवर्तक कलाकृती सादर करणे अधिक महत्त्वाचे असल्याचा संदेश या महोत्सवातून दिला जात आहे.

विशेष म्हणजे, आज ज्या कलाकारांना या रंगमंचावर संधी मिळत आहे, त्यांच्यापैकी एखादा कलाकार उद्या मराठी व्यावसायिक रंगभूमीवर झळकणार नाही, असे कोणीच ठामपणे सांगू शकत नाही. कारण प्रत्येक मोठ्या कलाकाराचा प्रवास हा एका छोट्या व्यासपीठापासूनच सुरू झालेला असतो. प्रशांत दामले, भरत जाधव, भाऊ कदम, वंदना गुप्ते, अमृता सुभाष यांसारख्या दिग्गज कलाकारांनी आपल्या मेहनतीने यशाची शिखरे गाठली. आज याच रंगभूमीवर अभिनय करणाऱ्या ग्रामीण कलाकारांमध्येही तेच साम र्थ्य, तीच जिद्द आणि तेच स्वप्न पाहायला मिळत आहे.

''आजचा नवोदित कलाकार म्हणजे उद्याच्या मराठी रंगभूमीचा नवा चेहरा,'' ही भावना या महोत्सवातून प्रकर्षाने जाणवते. त्यामुळेच या कलाकारांना संधी उपलब्ध करून देणाऱ्या चित्रलेखा पाटील यांचे योगदान अत्यंत मोलाचे ठरते.

ग्रामीण भागातील कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांच्या कलेला प्रोत्साहन देणे आणि सांस्कृतिक चळवळीला नवी ऊर्जा देणे हे कार्य सातत्याने करणाऱ्या चित्रलेखा पाटील यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. कलाकारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांना प्रोत्साहन देण्याचे काम त्या निष्ठेने करत आहेत. एखादा कलाकार घडवणे म्हणजे केवळ त्याला संधी देणे नव्हे, तर त्याच्या स्वप्नांवर विश्वास ठेवणे असते. तो विश्वास चित्रलेखा पाटील यांनी जपला आहे.

अलिबागच्या रंगभूमीचा इतिहास पाहिला तर आजच्या आधुनिक सुविधांच्या मागे संघर्षाची मोठी कहाणी दडलेली आहे. एकेकाळी बंदिस्त नाट्यगृह नव्हते, अत्याधुनिक प्रकाशयोजना नव्हती, दर्जेदार ध्वनीव्यवस्था नव्हती. खुल्या मैदानात स्टेज उभारले जात असे. कंदील, पेट्रोमॅक्स आणि मर्यादित साधनसामग्रीच्या मदतीने नाट्यप्रयोग सादर केले जात. आयोजकांची आर्थिक आणि व्यवस्थापकीय कसरत होत असे. तरीही कलाकारांचा उत्साह आणि रसिकांचे प्रेम कमी होत नव्हते. त्या काळातील हाऊसफुलचे फलक आजही अनेकांच्या स्मरणात आहेत.

आज परिस्थिती बदलली आहे. सुसज्ज नाट्यगृह, आधुनिक प्रकाशयोजना, उत्कृष्ट ध्वनीव्यवस्था आणि दर्जेदार सुविधा कलाकारांना उपलब्ध आहेत. या परिवर्तनामागे चित्रलेखा पाटील यांचे योगदान विशेष उल्लेखनीय आहे. नाट्यगृहावर आलेल्या संकटानंतरही त्यांनी हार न मानता त्याला नवसंजीवनी दिली. आधुनिक आणि सुसज्ज स्वरूपात उभे राहिलेले हे नाट्यगृह आज अलिबागच्या सांस्कृतिक वैभवाचे प्रतिक बनले आहे. रायगड जिल्ह्याच्या प्रत्येक गावात रंगभूमीची समृद्ध परंपरा आहे. लोककला, एकांकिका, सामाजिक नाटके, विनोदी प्रयोग, एकपात्री आणि द्विपात्री सादरीकरणे यामधून अनेक कलाकार घडले. ही परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचावी आणि ग्रामीण प्रतिभेला योग्य व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेला 'रायगड नाट्यप्रभा' महोत्सव खऱ्या अर्थाने सांस्कृतिक चळवळ बनत आहे.

या महोत्सवात सहभागी झालेला प्रत्येक कलाकार, प्रत्येक दिग्दर्शक, प्रत्येक तंत्रज्ञ आणि प्रत्येक कलारसिक हा या सांस्कृतिक प्रवासाचा महत्त्वाचा भाग आहे. कारण कला जिवंत राहते ती कलाकारांच्या समर्पणामुळे आणि रसिकांच्या प्रेमामुळे. याच दोन्ही गोष्टींचा सुंदर संगम या महोत्सवात पाहायला मिळत आहे.

आज रंगमंचावर पडणारा प्रत्येक प्रकाशझोत हा केवळ एका कलाकारावर पडत नाही, तर एका स्वप्नावर, एका आशेवर आणि एका उज्ज्वल भविष्यावर पडत असतो. कदाचित उद्या मराठी व्यावसायिक रंगभूमीवर झळकणारा एखादा कलाकार अभिमानाने सांगेल की, ''माझ्या कलाप्रवासाची पहिली ठाम पायरी अलिबागच्या 'रायगड नाट्यप्रभा' महोत्सवाच्या रंगमंचावर रचली गेली होती.''

याच विश्वासामुळे 'रायगड नाट्यप्रभा' हा केवळ नाट्य महोत्सव राहत नाही, तर तो ग्रामीण प्रतिभेच्या स्वप्नांना दिशा देणारा दीपस्तंभ ठरतो. आणि त्या दीपस्तंभामागे उभ्या असलेल्या चित्रलेखा पाटील यांचे कार्य खऱ्या अर्थाने वंदनीय, प्रेरणादायी आणि सांस्कृतिक इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले जावे असेच आहे.

''रंगभूमीवर उमलणारी प्रत्येक प्रतिभा ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आकाशातील उद्याची नवी चांदणी असते. दिग्गजांच्या पाऊलखुणा जपणाऱ्या अलिबागच्या या रंगभूमीवर आज ग्रामीण प्रतिभेची नवी पहाट उगवत आहे; आणि त्या पहाटेच्या क्षितिजावर चित्रलेखा ताई पाटील यांचे योगदान सुवर्णाक्षरांनी कोरले जात आहे.''

**माजी अध्यक्ष, अखिल भारतीय नाट्य परिषद, रायगड**

चर्चा आजची

# माथेरानमधील पर्यटन संकटात...

संतोष राऊळ

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटन स्थळ आणि आशियातील पहिलेच वाहनमुक्त थंड हवेचे ठिकाण असलेल्या माथेरानचा शोध १८५० साली ठाण्याचे जिल्हाधिकारी कलेक्टर ह्यू पॉईंट्झ मॅलेटे यांनी लावला होता. त्यानंतर लॉर्ड एल्फिन्स्टन यांनी वसाहतीकालीन विश्रामस्थळ म्हणून याचा विकास केला. त्यावेळी ब्रिटिश प्रथम चौक परिसरातील डोंगरातून माथ्यावरील रानावर पोहचले होते. २१ मे १८५० रोजी माथेरानचा शोध लावण्याची नोंद ब्रिटिश गॅझेट मध्ये आहे. तसेच, या थंड हवेच्या ठिकाणी सहज पोहोचता यावे यासाठी, १९०७ साली सर आदमजी पीरभॉय यांनी नॅरो-गेज माथेरान हिल रेल्वे बांधली. ही प्रसिद्ध खेळण्यासारखी रेल्वेगाडी २० किलोमीटरच्या घनदाट जंगलातून वळणावळणाने जाते. अमन लॉजमधून शटल सेवा म्हणून चालवली जाणारी ही रेल्वेगाडी म्हणजेच मिनिट्रेन आजही एक प्रमुख पर्यटन आकर्षण ठरत आहे. आज माथेरान एक पर्यावरण-संवेदनशील प्रदेश म्हणून ओळखला जाते. या ठिकाणी वाहनांवर पूर्ण बंदी असल्यामुळे पर्यटकांना चालणे, घोड्यावरून प्रवास करणे, हाताने ओढल्या जाणाऱ्या रिक्षाने आणि अलिकडेच उपलब्ध झालेल्या ई-रिक्षोने प्रवास करणे भाग पडते. त्यामुळे या प्रदेशाला आपले जुने, वसाहतकालीन आकर्षण आणि घनदाट जंगल टिकवून ठेवण्यास मदत होते. हे सर्व ऐकूनच देशभरातील पर्यटक माथेरान या ठिकाणी दरवर्षी हजारोंच्या संख्येने भेटी देत असतात. परंतु, पर्यटक याठिकाणावरून परतताना खुप वाईट अनुभव घेऊन जातो, ही आजची सत्य परिस्थिती आहे. त्यामुळे भविष्यात माथेरानमधील पर्यटन व्यवसाय संकटात येऊन स्थानिकांवर उपासमारिची वेळ येण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

माथेरान या थंड हवेच्या ठिकाणी दरवर्षी हजारोंच्या संख्येने पर्यटक येत असतात. खासकरून



उन्हाळी सुट्टीत मोठ्या प्रमाणात याठिकाणी गर्दी असते. माथेरान शहरामध्ये वाहतुक बंदी असल्यामुळे पर्यटकांना शहराच्या बाहेर वाहन उभे करून पायी, घोड्यावर बसून किंवा हातरिक्षाने शहरात जावे लागते. काही वर्षांपूर्वी या ठिकाणी ई-रिक्षा उपलब्ध झाल्यामुळे काही प्रमाणात पर्यटकांसह स्थानिकांना दिलासा मिळाला आहे. माथेरानमधील व्यावसायिक हे पुर्णपणे पर्यटनावर अवलंबुन असतात. त्यामुळे त्यांच्या व्यवसायावर कमी-जास्त पर्यटकांच्या संख्येचा परिणाम होत असतो. या ठिकाणी येणारा प्रत्येक पर्यटक हौशीने येतो खरा, परंतु परतीच्या मार्गावर लागताना तो खुप वाईट अनुभव घेऊन जातो. जर पर्यटकांना वाईट अनुभव येत असतील, तर या ठिकाणी पिढ्यानपिढ्या राहणाऱ्याला काय अनुभव असतील, असा विदारक प्रश्न स्थानिक नागरिक उपस्थित करत आहेत. त्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे.

माथेरानकरांना व पर्यटकांना सर्वात मोठा भेडसावणारा प्रश्न म्हणजे प्रवास. माथेरान शहराकडे ये-जा करण्यासाठी नेरळ-माथेरान हा एकमेव घाटरस्ता आहे. हा रस्ता त्यावेळी श्रमदानातून बनविण्यात आला होता. आता जरी डांबरीकरण आणि सुरक्षा कठडे बसविण्यात आले असले, तरी या ठिकाणी अपघातांची मालिका सुरूच असते. हा रस्ता अरूंद असल्याने मोठी वाहने या रस्त्यात अडकतात. सुट्टीच्या दिवसांत तर मोठ्या प्रमाणात वाहने आल्याने मोठी वाहतुक कोंडी होते. त्यामुळे पर्यटकांना पायपीट करत शहरात पोहोचावे लागते. बरेच वर्ष माथेरानसाठी पर्यायी मार्गाची मागणी होत आहे. परंतु, त्या दिशेने कोणतेही पाऊल उचलले जात नाही. त्याचबरोबर माथेरानमध्ये येण्यासाठी पर्यटकांची लाडकी मिनिट्रेन नेरळ स्थानकातून सोडली जाते. परंतु, या मिनिट्रेनच्या काही नेमक्याच फेऱ्या असल्यामुळे बऱ्याच पर्यटकांचा हिरमोड होत आहे. मिनिट्रेनच्या फेऱ्या वाढविण्यासाठी देखील अनेक वेळा अधिकाऱ्यांकडे गाऱ्हाणी मांडण्यात आली आहेत. परंतु, त्यातही संबंधित प्रशासनाला अपयश येत आहे. पावसाळ्यातील चार महिने तर हि मिनिट्रेन बंद करण्याची नामुष्की प्रशासनावर येत असते. माथेरानमधील प्रवासी वर्ग आणि विद्यार्थ्यांना नेरळ तसेच तालुक्याच्या ठिकाणी जाण्यासाठी शहराच्या बाहेरून मिनिबसची सोय आहे. परंतु, या मिनिबस देखील भंगार झाल्या असून, त्यातून जीव मुठीत धरून प्रवास करण्याची वेळ येते. नुकत्याच माथेरानमध्ये ई-रिक्षा देखील उपलब्ध करण्यात आल्या आहेत. त्याला मोठ्या प्रमाणात पर्यटकांसह स्थानिकांचा प्रतिसाद लाभला. परंतु, त्या देखील मर्यादित असल्यामुळे प्रवासी वर्गाची मोठ्या प्रमाणात वानवा होत आहे. हातरिक्षा ही अमानवी प्रथा बंद करण्यासाठीच ई-रिक्षा सुरू करण्यात आल्या होत्या. परंतु, तेथेही संबंधित प्रशासनाचे अपयश स्पष्टपणे दिसत आहे.

यासह अनेक समस्या या ठिकाणी पर्यटकांसह स्थानिकांना भेडसावत आहेत. रस्ते, पाणीपुरवठा, तसेच इतर मुलभुत सेवासुविधांसाठी स्थानिकांना आंदोलन करावे लागत आहे. येथील व्यावसायिक फक्त पर्यटनावर अबलंबून असल्याने, पुढेही अशीच परिस्थिती राहिल्यास त्याचा परिणाम थेट पर्यटनावर होईल. आणि त्यामुळे स्थानिकांवर उपासमारिची वेळी येऊ शकते. त्यामुळे लोकप्रतिनिधिंनी निवडणुकीच्यावेळी आश्वासनांचे गाजर न दाखवता माथेरानच्या विकासासाठी शंभर टक्के प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा स्थानिकांमधून व्यक्त केली जात आहे.

लोकसंसद

## गावगाड्यातील तमाशा महर्षी आता झाला पद्मश्री

लोकनाट्य-तमाशा क्षेत्रातील प्रदीर्घ योगदानाबद्दल संगमनेरचे ज्येष्ठ कलावंत आणि भारतीय तमाशा फड मालक संघटनेचे अध्यक्ष रघुवीर खेडकर यांना नुकताच 'पद्मश्री' किताब मिळाला आहे त्यामूळे तमाशा क्षेत्रासोबतच संगमनेरच्या इतिहासाला सुवर्णपान जोडल्याची भावना व्यक्त होत आहे. खेडकर यांच्या रूपाने तमाशा क्षेत्रात पहिल्यांदाच पद्म पुरस्कार दिला जात असल्याने हा सन्मान म्हणजे अवघ्या तमाशा सृष्टीचा सन्मान आहे आपले संपूर्ण आयुष्य तमाशा कलेला सम र्पित करणाऱ्या स्वर्गीय कांताबाई सातारकर आणि तुकाराम खेडकर यांचे पुत्र रघुवीर खेडकर यांनी आई-वडिलांचा वसा चालवत संपूर्ण आयुष्य तमाशा कलेची सेवा केली. खेडकर यांनी अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेचा सन्मान मिळविलेला आहे पुणे विद्यापीठाने इतिहासात प्रथमच रघुवीर खेडकर यांचा सन्मान केला आहे. २०१० मध्ये दिल्लीत झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांच्या काळात दिल्लीच्या रवींद्र भवन येथे तमाशा सादर करण्याचा मान रघुवीर खेडकर यांना मिळाला होता. संगीत नाटक अकादमीने चंडीगड येथे त्यांच्या तमाशाचे आयोजन केले होते. अकलूज येथे झालेल्या ढोलकी फड तमाशा स्पर्धेतही खेडकर तमाशा फडाने प्रथम क्रमांक मिळवला होता. हा पद्म पुरस्कार म्हणजे महाराष्ट्राच्या ग्रामीण कलेचा गौरव असून, त्यामुळे तमाशा कलेचा नावलौकिक झाला आहे खेडकर परिवाराचे मोठे योगदान तमाशा कलेसाठी आहे. आव्हानात्मक परीस्थितीत तमाशा कला जिवंत ठेवण्यासाठी समर्पित भावनेने दिलेल्या योगदानाचा गौरव केंद्र सरकारने केल्याचा अभिमान आहे. तमाशा ग्रामीण महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग आहे. रघुवीर खेडकर गण, गवळण, बतावणी आणि वगनाट्य अशी पारंपारिक कला सादर करून गावाखेड्यातील लोकांचे मनोरंजन करणारा तमाशा महर्षी आता पद्मश्री झाला आहे त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन...!

**- राजू जाधव, मांगूर जि. बेळगांव**

दिनविशेष

# 'स्वातंत्र्यवीर सावरकर' एक ज्वलंत मशाल

विनायक दामोदर सावरकर हे भारतीय स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार करणारे थोर देशभक्त, साहित्यिक आणि समाजसुधारक होते. त्यांचा जन्म २८ मे १८८३ रोजी नाशिकपासून काही अंतरावर असलेल्या भगूर या गावी झाला. सावरकर कुटुंब हे कोकणातील गुहागर पेट्यातून देशावर आले. सावरकरांचे शिक्षण भगूर, नाशिक, पुणे आणि मुंबई येथे एलएलबीपर्यंत झाले. पुढे 'बॅरिस्टर' ही पदवी त्यांनी लंडनला जाऊन घेतली. विद्यार्थी जीवनाच्या आरंभापासूनच सावरकरांचा वाचनाकडे ओढा होता. त्यात विष्णुशास्त्री चिपळूणकरांची निबंधमाला, रामायण-महाभारत, विविध बखरी आणि इतिहासग्रंथ, तसेच मोरोपंत, वामनादिकांचे काव्यग्रंथ इत्यादी साहित्याचा समावेश त्यात होता. 'जयोस्तुते जयोस्तुते' हे गाणं ऐकल्यानंतर एक वेगळीच स्फुर्ती मराठी माणसाच्या अंगात संचारते आणि समोर उभा राहतो तो स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा चेहरा.

विनायक दामोदर सावरकर हे भारतीय इतिहासातील स्वातंत्रसेनानी म्हणून ओळखले जातात. ते एक कार्यकर्ते, लेखक आणि क्रांतीकारी होते. तर्कसंगतता, नास्तिकता, सामाजिक सुधारणा आणि हिंदुत्व तत्वज्ञानाची रचना या त्यांच्या कल्पना आपल्या देशासाठी त्यांच्या महान योगदानांपैकी एक आहेत. त्यांनी त्यांचे आत्मचरित्र लिहिताना वीर हा सम्माननीय उपसर्ग वापरण्यास सुरुवात केली. ब्रिटीश वसाहतवादाच्या विरोधात क्रांतिकारी कारवायांसाठी सावरकरांना तुरुंगवासही भोगावा लागला. त्यांनी 'भारतीय स्वातंत्र्याचे पहिले युद्ध आणि हिंदुत्व : हिंदू कोण आहे?' सारख्या प्रभावी ग्रंथांचे लेखन केले ज्यांनी भारतातील राजकीय चर्चासत्राला आकार दिला. त्यांच्या 'सागरा प्राण तळमळला', 'हे हिंदु नृसिंहा प्रभो शिवाजी राजा', 'जयोस्तुते' 'तानाजीचा पोवाडा' ह्या कविता प्रचंड लोकप्रिय आहेत. त्यांच्या विचारांभोवती वाद असूनही, वीर सावरकरांचा भारताच्या स्वातंत्र्य चळवळीवरील प्रभाव आणि राष्ट्रवादी विचारसरणींना आकार देण्यात त्यांची भूमिका त्यांच्या वारशाचे महत्त्वाचे पैलू आहेत. सावरकर नेहमी असे म्हणायचे की तयारीत शांतता पण अंमलबजावणीत धाडस - संकटाच्या क्षणी हाच मंत्र असला पाहिजे. जो मंत्र आजही वैयक्तिक प्रगतीचा जनक आहे. सावरकरांच्या क्रांतिकारी कार्याची सुरुवात १९०३ पासून झाली. नाशिकमध्ये सावरकर आणि त्यांचे मोठे भाऊ गणेश सावरकर यांनी मित्र मेळा ही एक भूमिगत क्रांतिकारी संघटना स्थापन केली, जी १९०६ मध्ये अभिनव भारत सोसायटी बनली. अभिनव भारतचे मुख्य उद्दिष्ट ब्रिटिश राजवट उलथवून हिंदू अभिमानाचे पुनरुज्जीवन करणे होते. जेव्हा ते कायद्याच्या अभ्यासासाठी युनायटेड किंग्डमला गेले तेव्हा त्यांनी इंडिया हाऊस आणि फ्री इंडिया सोसायटी सारख्या संघटनांमध्ये स्वतःला गुंतवून घेतले. १८९७ मध्ये पुण्यात आलेल्या प्लेगच्या साथीत इंग्रज सैनिकांनी घरोघरी जाऊन तपासण्या करताना नागरिकांवर जे अत्याचार केले, त्याचा सूड घेण्यासाठी चाफेकर बंधूंनी या तपासण्यांवर देखरेख करणाऱ्या पुण्याच्या कमिशनर रँड याचा खून केला. चाफेकर बंधूंना फाशी देण्यात आली. त्यांच्या बलिदानाचा सावरकरांच्या मनावर खोल ठसा उमटला आणि त्यांनी स्वातंत्र्यासाठी सशस्त्र युद्ध करण्याची शपथ घेतली. १८९९ मध्ये सशस्त्र क्रांतीच्या कार्यासाठी त्यांनी 'राष्ट्रभक्त समूह' हे गुप्तमंडळ स्थापन केले. त्यांनी जानेवारी १९०० मध्ये 'मित्रमेळ्या'ची स्थापना केली.

त्यांच्याभोवती अनेक निष्ठावंत तरुण जमले. त्यांत कवी गोविंद यांचा समावेश होता. शिवजयंत्युत्सव, गणेशोत्सव, मेळे यांच्या माध्यमातून लोकजागृती घडवून आणणाऱ्या मित्रमेळ्याच्या कार्यक्रमाला कवी गोविंदांच्या काव्यरचनांनी प्रभावी साथ दिली. पुढे १९०४ मध्ये या मित्रमेळ्याचे रूपांतर 'अभिनव भारत' या संस्थेत झाले. गनिमी काव्याच्या धोरणाने सैन्यात व पोलिसांत गुप्त क्रांतिकारकांची भरती करणे, रशियासारख्या परराष्ट्रांशी गुप्त संधान बांधणे, इंग्रजी सत्तेच्या केंद्रांवर आणि प्रतिनिधींवर हल्ले करणे, शस्त्रास्त्रे साठवणे इत्यादी मार्ग अवलंबून इंग्रजांना राज्य करणे नकोसे करून सोडावे, असे मार्ग सावरकरांना उचित वाटत होते. अशा या थोर क्रांतिकारकाचे २६ फेब्रुवारी १९६६ रोजी निधन झाले.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२८ मे

१)श्रीम.निशिगंधा शशिकांत कंटक मु.सहाण-गोठी, अलिबाग २८-०५-१९४८

२) श्री.नंदकुमार मधुकर डोळस मु.विद्यानगर अलिबाग, २८-०५-१९४४

३)श्रीम.शिल्पा सिताराम नाईक चेंढरे, अलिबाग २८-०५-१९६४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५

(अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते



कै.लक्ष्मीबाई दामोदर पाटील, अलिबाग



कै.श्रीमती.मालती मदन वैद्य,प्रथम स्मृतिदिन, कांदिवली मुंबई

# प्लास्टिक, कचरा खाऊन मोकाट गुरांचे आरोग्य धोक्यात

| धाटाव | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील धाटाव ग्रामपंचायत हद्दीतील नाक्यावर असलेल्या कचरा कुंडीतील कचरा आणि प्लास्टिक मोकाट गुरे खात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ग्रामपंचायत प्रशासनाच्या ढिसाळ आणि नियोजनाअभावी गावातील मुख्य रस्त्यांवर कचऱ्याचे ढीग साचले आहेत. अनेक दिवसांपासून ही कचरा कुंडी साफ न केल्यामुळे कचरा रस्त्यावर पसरला आहे. या पसरलेल्या कचऱ्यात परिसरातील मोकाट जनावरे अन्नाच्या शोधात फिरत आहेत. सुका आणि ओला कचरा एकत्र असल्याने, भूकेपोटी ही निष्पाप जनावरे प्लास्टिक



### ● धाटाव ग्रामपंचायत प्रशासनाचे दुर्लक्ष

पिशव्यांसह कचरा गिळंकृत करताना दिसत आहेत.

कचरा कुंडीची नियमित स्वच्छता होत नसल्याने तिथे दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. कचऱ्यामध्ये प्लास्टिक, शिळे अन्न, रिकाम्या दूध पिशव्या, कागदी पुठ्ठे आणि इतर घातक वस्तूंचा समावेश असतो. गायी, बैल आणि इतर मोकाट जनावरे हा कचरा खातात. प्लास्टिक पोटात गेल्यामुळे अनेक गुरांना पोटदुखी आणि इतर गंभीर आजार होत आहेत. काही ठिकाणी गायीने प्लास्टिक खाल्ल्याने मृत्यू झाल्याच्या घटनाही घडल्या आहेत. मात्र, या गंभीर समस्येकडे ग्रामपंचायत प्रशासनाचे अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही.

नाक्यावर रस्त्यावरून जात असताना आणि हाकेच्या अंतरावर असलेल्या या कचरा कुंडीतील ओव्हरफ्लो कचरा येथील संबंधित अधिकारी, कर्मचारी वर्गाला दिसत नाही हेच विशेष म्हणावे लागेल. नाक्यावरील दुकानातून दूध डेअरी, भाजीवाले, हॉटेल, चायनिज सेंटर, चिकन सेंटरमधून आलेल्या कचऱ्यामुळे कचरा कुंडी सतत ओव्हरफ्लो असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

मोकाट गुरे उंच कचरा कुंडीच्या आतमध्ये उतरून कचरा खाताना पहावयास मिळत आहे. तरी प्रशासनाने कचरा कुंड्यांची नियमित स्वच्छता करून घ्यावी आणि मोकाट गुरांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी येथील सर्वसामान्य नागरिक वर्गातून होत आहे.

### कचराकुंडीची अनियमित स्वच्छता

घंटागाडीची सोय नियमित नसल्याने नागरिक कचरा कुंडीतच कचरा टाकतात. मात्र, तो कचरा वेळेवर उचलला जात नाही. कचरा कुंडीची नियमित स्वच्छता होत नसल्याने तिथे दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. तर मोकाट गुरेही प्लास्टिक खात आहेत. या प्रकारामुळे मोठी साथ पसरून नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते.

## मासेमारी हंगाम अखेरच्या टप्प्यात

| रत्नागिरी | प्रतिनिधी |

मान्सूनच्या आगमनाची वर्दी मिळताच आणि १ जूनपासून सुरू होणाऱ्या ७१ दिवसांच्या मासेमारी बंदीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील मासेमारी हंगाम अंतिम टप्प्यात आला आहे. मच्छीमारांनी आपल्या नौका सुरक्षित ठिकाणी हलवून त्यांची डागडुजी सुरू केली आहे. आभाळात दाटून येणारे काळे ढग, वाढणारा वाऱ्याचा वेग आणि समुद्रातील उंचावणाऱ्या लाटा यामुळे मच्छीमारांनी सुरक्षिततेचा उपाय म्हणून आपल्या मच्छिमारी बोटी किनाऱ्यावर आणण्यास सुरुवात केली आहे. वर्षभर समुद्रात मासेमारीसाठी वापरण्यात येणारी विशाल जाळी सुकवण्यासाठी



कातळावर पसरवण्यात आली आहेत. भर उन्हात ही जाळी व्यवस्थित सुकवून त्यांची घडी घालण्याचे काम खलाशी करत आहेत. त्यानंतर ही जाळी ट्रकमधून सुरक्षित गोदामांमध्ये हलवली जात आहेत. पावसाळ्यात ओलाव्यामुळे लाखो रुपये किमतीची जाळी खराब होऊ नयेत, यासाठी मच्छीमारांकडून विशेष काळजी घेतली जात आहे. त्यामुळे किनारपट्टी भागात सध्या जाळी आवरणे, बोटी बांधून ठेवणे आणि साहित्य सुरक्षितस्थळी हलवणे अशी लगबग सुरू झाली आहे.

## ग्रुप ग्रामपंचायत जासईचा द्वितीय क्रमांकाने सन्मान

| उरण | प्रतिनिधी |

महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री पंचायत राज अभियान अंतर्गत महाराष्ट्र शासनाने उरण तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत जासईच्या कार्याचा गौरव करत दुसरा क्रमांक देऊन त्यांचा सन्मान केला आहे. ग्रुप ग्रामपंचायत जासईने सर्वच घटकासाठी अनेक कल्याणकारी योजना राबविल्या आहेत. अनेक विकासकामे केली आहेत, त्यामुळे त्यांना हा उरण तालुक्यामध्ये दुसरा क्रमांक मिळाला आहे.



जासईचे सरपंच संतोष घरत यांच्या नेतृत्वाखाली जासई ग्रुप ग्रामपंचायतीने महाराष्ट्र शासनअंतर्गत राबविण्यात आलेल्या 'मूख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान'मध्ये दूसरा क्रमांक पटकविला आहे. बक्षिसपात्र रक्कम-१२ लाख ग्रामपंचायतला मिळणार आहे. अभियान यशस्वी करण्यासाठी महत्वाचे योगदान देणाऱ्या सरपंच, उपसरपंच व सर्व सदस्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## राजमाता जिजाऊ बसेसचे आगमन

**रत्नागिरी :** रत्नागिरी विभागात अखेर राजमाता जिजाऊ बसेसचे आगमन झाले आहे. सोमवारी (दि.२५) पासून जिल्हांतर्गत, कोल्हापूर, मिरजसह इतर लांब पल्ल्याच्या अंतरावर प्रवासाला सुरूवात झाली आहे. रत्नागिरी आगारासाठी तब्बल १८ बसेस आल्या आहेत. भगव्या रंगाची बस प्रवाशांच्या पसंतीस पडली असून वाढत्या गर्दीमुळे उभे रहावे लागत होते; मात्र नव्या बसेसमुळे अडचण दूर होणार आहे, अशा प्रतिक्रीया प्रवाशांनी दिल्या आहेत.

## अवैधरित्या गुटखा वाहतुकीचा पर्दाफाश

**पालघर :** पालघर जिल्ह्यातून मुंबई, वसई, भिवंडी, कल्याणसह विविध शहरांकडे अवैधरित्या गुटखा वाहतूक होत असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील चारोटी टोलनाका परिसरात कासा पोलिसांनी धडक कारवाई करत तब्बल ३८ लाख २१ हजार ६०० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा व वाहनासह मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी वाहन चालकाला अटक करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी रात्री महामार्ग परिसरात काही स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांना एक संशयास्पद आयशर टेम्पो दिसून आला. त्यांनी तत्काळ कासा पोलीस ठाण्याशी संपर्क साधत माहिती दिली. त्यानंतर कासा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत संबंधित वाहन थांबवून तपासणी केली असता गुजरातहून मुंबईच्या दिशेने महाराष्ट्रात बंदी असलेला गुटखा वाहतूक होत असल्याचे उघड झाले. तपासणीदरम्यान टेम्पोमधून मोठ्या प्रमाणात गुटखा, पानमसाला व तंबाखूचा साठा आढळून आला. पोलिसांनी वाहन चालक अरमान इस्माईल शेख (२१) याला ताब्यात घेतले. चौकशीत हा माल गुजरातमधून भिवंडी येथे विक्रीसाठी घेऊन जात असल्याची माहिती समोर आली.

## वृद्ध दाम्पत्याला लाखोंचा गंडा

### ● वैद्यकीय विमा पॉलिसीद्वारे फसवणूक

| मुंबई | प्रतिनिधी |

मलाबार हिल परिसरात राहणाऱ्या एका वृद्ध दाम्पत्याची वैद्यकीय विम्याच्या बहाण्याने लाखो रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकाश समोर आला आहे. एका महिला विमा एजंटने दाम्पत्याकडून नियमितपणे विम्याचे हप्ते स्वीकारले, मात्र त्याबदल्यात त्यांना बनावट वैद्यकीय विमा पॉलिसीची कागदपत्रे दिली, असा आरोप करण्यात आला आहे. या वृद्ध महिलेला वैद्यकीय उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले, तेव्हा ही फसवणूक उघडकीस आली.

नागेंद्र शर्मा (७३) यांनी तक्रारीत नमूद केले आहे की, २०२१ मध्ये त्यांनी 'केअर हेल्थ इन्शुरन्स' कंपनीची वैद्यकीय पॉलिसी शुमैला अन्सारी नावाच्या एजंटमार्फत खरेदी केली होती. तेव्हापासून, त्यांनी दरवर्षी नियमितपणे विम्याचे हप्ते भरले. तसेच आरोपी एजंटने प्रत्येक हफ्त्यावेळी त्यांना पावत्या आणि कागदपत्रे पुरवली होती. शर्मा यांनी सांगितले की, त्यांच्या पत्नीला मणक्याच्या उपचारांसाठी 'सैफी रुग्णालयात' दाखल करण्यात आले होते. कॅशलेस उपचारांची सुविधा मिळवण्यासाठी त्यांनी रुग्णालयाच्या विमा विभागाशी संपर्क साधला, मात्र विमा कंपनीच्या रेकॉर्ड्समध्ये या विशिष्ट पॉलिसीबाबत कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याचे तसेच, पॉलिसीची कागदपत्रे बनावट असल्याचेही रुग्णालयाने स्पष्ट केले. त्यानंतर, त्यांनी आरोपी एजंटशी संपर्क साधला असता पॉलिसीची कागदपत्रे खरी आहेत, असे आश्वासन देत तिने त्यांना रुग्णालयाचे बिल सध्या भरा. विम्याची रक्कम नंतर परत केली जाईल, असा सल्ला दिला. अन्सारी हिच्या आश्वासनांवर विश्वास ठेवून त्यांनी रुग्णालयात २.५ लाख रुपये जमा केले. मात्र त्यानंतर अन्सारीने त्यांच्या कॉल्स आणि मेसेजेसना प्रतिसाद देणे बंद केले. शर्मा यांनी विमा कंपनीकडे विम्याबाबत पुन्हा नव्याने चौकशी सुरू केली. मात्र विमा कंपनीने त्यांना एजंटने दिलेली सर्व कागदपत्रे बनावट असल्याचे सांगितले.

## 'पंढरपूर वारी, अतिवृष्टीच्या कालावधीत एसआयआर कार्यक्रम राबवू नका'

| मुंबई | प्रतिनिधी |

महाराष्ट्रातील मतदार यादी विशेष सखोल पुनर्रिक्षण मोहिमेचा दुसरा टप्पा ३० जून ते २९ जुलै दरम्यान सुरु होणार आहे. या कालावधीमध्ये आषाढी वारी असून राज्यातील लाखो वारकरी वारीत सहभागी होत असल्याने ते गावाबाहेर असतील, त्यामुळे त्यांची नावे वगळली जाण्याची भीती आहे. याचा विचार करुन पंढरपूर वारी आणि अतिवृष्टीच्या कालावधीत एसआयआर कार्यक्रम आयोजित करू नये. तो महिनाभर पुढे ढकलावा, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी चोकलिंगम यांना पत्र लिहून केली आहे.

राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी चोकलिंगम यांना पाठवलेल्या पत्रात पुढे असे म्हटले आहे की, निवडणूक आयोगाने १४ मे रोजी मतदार यादी पुनरिक्षण एसआयआर कार्यक्रम घोषित केला असून महाराष्ट्रात मॅपिंगचे काम अंदाजे ७२ टक्क्यापर्यंत झाले असल्याचे आयोगाने दिलेल्या माहितीवरून समजते. दि.१९ जून २०२६ पर्यंत हे काम सुरु राहणार असून दुसरा टप्पा ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत राबविला जाणार असल्याचे समजते, यासाठी बीएलओ घरोघरी जाऊन गणना प्रपत्र वाटप करून मतदारांकडून भरून घेतले जाणार आहे. या कालावधीत आषाढी वारी आहे. पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भातील जवळपास २० हून अधिक जिल्ह्यातील वारकरी या कालावधीत पंढरपूरला वेगवेगळ्या दिंड्यांमधून पायी जात असतात, ते घरी नसल्याने त्यांची नावे वगळली जाऊ शकतात. तसेच हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार जुलै महिन्यात महामुंबई परिसर, कोकण, पुणे, सातारा भागात अतिवृष्टी होईल व जनजीवन विस्कळीत होईल. या सर्वांचा विचार करून एसआरए कार्यक्रम महिनाभर पुढे ढकलावा असे म्हटले आहे.

## बंद घराला आग

**रत्नागिरी :** रत्नागिरी शहराजवळील आंबेशेत कर्ला परिसरात एका बंद घराला अचानक आग लागली. स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. घर बाहेरून कुलूपबंद असल्याने सुरुवातीला आग विझवण्यात प्रचंड अडचणी येत होत्या. मात्र, स्थानिकांनी वेळ न घालवता घराचे कुलूप तोडले आणि आत प्रवेश केला आणि घरातील गॅस सिलेंडर तातडीने सुरक्षितरित्या बाहेर काढले. नागरिकांच्या समयसूचकतेमुळे मोठी जीवितहानी व अनर्थ टळला. मात्र या आगीत घरातील संपूर्ण साहित्य, सोन्या-चांदीचे दागिने आणि तब्बल दोन लाख रुपयांची रोकड जळून खाक झाली आहे.



## ड्रेनेज लाईनच्या झाकणांची दुरवस्था

| पनवेल | प्रतिनिधी |

कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर ड्रेनेज लाईनच्या झाकणांची अत्यंत दयनीय अवस्था निर्माण झाली आहे.

वाढत्या वाहतुकीमुळे या उघड्या व तुटलेल्या झाकणांमुळे मोठा अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी वाहनचालकांना मोठा धोका निर्माण होत असून दुचाकीस्वार जीव मुठीत धरून प्रवास करत आहेत. प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन या धोकादायक झाकणांची दुरुस्ती करावी, अशी नागरिकांची मागणी आहे.

'रंगोत्सव २०२६'ला नागरिकांचा प्रतिसाद | योशिता आर्टचा स्तुत्य उपक्रम

# उरणमध्ये रंगले बाल कल्पकतेचे प्रदर्शन

| उरण | प्रतिनिधी |

बालकांच्या हातातील मोबाईलचे व्यसन सोडवून त्यांच्यातील सुप्त गुणांना कॅनव्हासवर आणण्याच्या उद्देशाने रंगोत्सव २०२६ (बॅच २) हे भव्य चित्र प्रदर्शन आयोजित केले होते. या प्रदर्शनाची सांगता व पुरस्कार सोहळा उरण येथील जेएनपीए स्टाफ क्लब येथे उत्साहात पार पडला. योशिता आर्ट क्लासेस आणि मथुरा महादेव एज्युकेशन सेंटर यांच्या वतीने भरवण्यात आलेल्या या ॲक्रेलिक कॅनव्हास पेंटिंग प्रदर्शनाने उरणमधील कलाप्रेमींची मने जिंकून घेतली.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते कलेची आराध्य देवता नटराज मूर्तीचे पूजन, पुष्पहार आणि दीपप्रज्वलन करून या देखण्या कलाप्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी प्रसिद्ध चित्रकार मिलिंद ठाकूर यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात आजच्या पिढीच्या मानसिकतेवर थेट बोट ठेवले. ते म्हणाले, ''आजची लहान मुले मोबाईलच्या आभासी दुनियेत इतकी गुंतली आहेत की, पालकांचे ऐकणेही त्यांनी बंद केले आहे. या मानसिकतेमुळे मुले नैराश्य आणि चिडचिडेपणाकडे झुकत आहेत. त्यांना यातून बाहेर काढून जगाकडे सुंदर नजरेने पाहण्याचा कलात्मक दृष्टिकोन देणे हाच या ७ दिवसीय सेमिनारचा मुख्य हेतू होता. मुलांनी कोऱ्या कॅनव्हासवर उमटवलेले सुंदर रंग ही त्यांच्या कल्पकतेची आणि एकाग्रतेची पावती आहे.

या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे, चित्रकला क्षेत्रात नॅशनल लेव्हल (राष्ट्रीय पातळीवर) यश संपादन करून उरणचा डंका संपूर्ण देशात पिटणाऱ्या तीन बालकलाकारांचा झालेला विशेष सत्कार करण्यात आला. यात साक्षी गणेश ठाकूर, भार्गवी रुपेश म्हात्रे, स्वरा रामानंद जाधव या तिन्ही गुणवंत विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते आकर्षक स्मृतीचिन्ह आणि योशिता मिलिंद ठाकूर हिने स्वतः हाताने तयार केलेले सुंदर गुलाबपुष्प देऊन गौरविण्यात आले. यासोबतच, या प्रदर्शनात सहभागी झालेल्या सर्व बालकलाकारांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक देण्यात आले.

> मुलांनी रेखाटलेले प्रत्येक चित्र त्यांच्या अंतर्मनाचा आणि स्वभावाचा आरसा असतो. अशा प्रकारची प्रदर्शने मुलांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी अत्यंत गरजेची आहेत.
> – रमाकांत गावंड, शिक्षक नेते व मुख्याध्यापक

## निवडक

### श्री स्वामी समर्थ मठाचा वर्धापन दिन

**तळा :** श्री स्वामी समर्थ मठ कासार आळी तळा येथे तृतीय वर्धापन दिन मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा झाला. तळा येथील कासार आळीत तीन वर्षांपूर्वी अतिशय सुंदर व आकर्षक श्री स्वामी समर्थ मठाची उभारणी करण्यात आली आहे. दररोज अनेक भक्तगण मोठ्या श्रद्धेने मंदिरात येऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतात आणि श्री स्वामी समर्थ नामाचा जयघोष करतात. अनेक भाविकांना श्री स्वामी समर्थ महाराज यांचा चमत्कार झाल्याचेही पहावयास मिळत आहे. अशा या श्री स्वामी समर्थ मठाच्या तृतीय वर्धापन दिनाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सोमवार दि.२५ मे रोजी सकाळी ५.३० वाजता काकड आरती, श्रीची षोडशोपचारे पूजा करण्यात आली. महेंद्र बुवा कजबजे व साथीदार यांचा भजनाचा बहारदार कार्यक्रम काकड आरती प्रसंगी पार पडला. त्यानंतर सकाळी ८.३० वाजता श्री गणेश पूजन, पुण्याहवाचन, षोडशोपचारे पूजा करण्यात आली. त्यानंतर सकाळी ९.३० वाजता श्री च्या मूर्तीवर अभिषेक, सकाळी साडेदहा वाजता होम हवन करण्यात आले. दुपारी एक वाजता आरती व महाप्रसाद श्री राधाकृष्ण मंदिर तळा येथे झाला. सायंकाळी चार वाजता श्रीचे पारायण त्यानंतर ससुश्राव्य भजनाचा कार्यक्रम पार पाडला. या कार्यक्रमाचा आनंद परिसरातील शेकडो श्री स्वामी समर्थ सेवेकऱ्यांनी अगदी आनंदाने घेतला.



### तालुकाध्यक्षपदी विजय बक्कम

**माणगाव :** कुणबी चॅरिटेबल ट्रस्ट मुंबईच्या माणगाव ग्रामीण तालुकाध्यक्षपदी कोशिंबळे गावचे सुपुत्र सामाजिक कार्यकर्ते तथा तरुणांचे आशास्थान विजय बक्कम यांची निवड ट्रस्टचे अध्यक्ष निलेश सत्वे यांनी करून बक्कम यांना पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. विजय बक्कम यांच्या या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून विशेष अभिनंदन होत आहे. कुणबी चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई यांचे सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात विशेष नाव आहे. माणगाव तालुक्यासह मुंबईमध्ये त्यांचे चॅरिटेबल ट्रस्टतर्फे कार्य सुरु आहे. या चॅरिटेबल ट्रस्टमार्फत शेतीविषयक प्रकल्प, ग्रामीण शाळा मदत उपक्रम, ग्रामीण वैद्यकीय सेवा उपक्रम, नैसर्गिक हात व पाय मदत उपक्रम, ग्रामीण वैद्यकीय इन्स्ट्रुमेंट मदत उपक्रम, ग्रामीण निमंत्रण उपक्रम, नैसर्गिक आपत्ती तात्काळ मदत तसेच गोरगरीब जनतेला मदतीचा हात असे एक ना अनेक सामाजिक, शैक्षणिक उपक्रम या चॅरिटेबल ट्रस्टतर्फे सातत्याने व यशस्वीपणे राबविले जाते. या ट्रस्टच्या माणगाव तालुकाध्यक्षपदी नुकतीच कोशिंबळे गावचे सुपुत्र सामाजिक कार्यकर्ते तथा तरुणांचे आशास्थान विजय बक्कम यांची निवड ट्रस्टचे अध्यक्ष निलेश सत्वे यांनी केली आहे. विजय बक्कम हे सामाजिक व शैक्षाणिक कार्यात अग्रेसर असणारे असे व्यक्तिमत्व आहेत. त्यांचे ट्रस्टमधील मागील दहा वर्षांपासूनचे कार्य पाहता सामाजिक प्रवाहामधून त्यांची ट्रस्टच्या माणगाव तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.



### अजगराला सर्पमित्राकडून जीवदान

**चिरनेर :** चिरनेर मुळपाडा येथील अरुण काशिनाथ मुंबईकर यांच्या घराजवळ ठेवण्यात आलेल्या पत्राच्या अडगळीत भर दुपारच्या वेळेत साधारणत: नऊ ते दहा फूट लांबीचा भला मोठा अजगर मंगळवारी (दि.२६) दिसला. अरुण मुंबईकर यांच्या पत्नी कमल मुंबईकर या एकट्याच घरात असल्यामुळे घाबरून गेल्या. मात्र प्रसंगावधन राखत, त्यांनी मुलगा प्रतीक मुंबईकर याला मोबाईलद्वारे अजगराचा वावर असल्याची माहिती दिली. प्रतीक मुंबईकर यांनी स्थानिक सर्पमित्र जयवंत ठाकूर यांच्याशी संपर्क साधून, घराजवळ अजगर असल्याची माहिती दिली. माहिती मिळताच, सर्पमित्र जयवंत ठाकूर यांनी घटनास्थळ गाठले आणि गारव्याच्या शोधात आलेल्या अजगराला मोठ्या शिताफीने पकडून जीवदान दिले. मानवी वस्तीत उकाड्यामुळे वन्यजीव शिरकाव करू लागले आहेत. त्यामुळे हा अजगर दुपारी भर उन्हाच्या वेळी गारव्याच्या शोधात आला असावा. मात्र कोणाला इजा होण्याआधीच सर्पमित्र जयवंत ठाकूर यांनी या अजगराला काळजीपूर्वक पकडून त्याला जीवदान दिले. त्यानंतर त्याला उरण तालुका वनविभागाच्या निर्देशानुसार सुरक्षित वनक्षेत्रात सोडून दिले.



### बेशिस्त वाहनचालकांविरोधात कारवाई

**पालघर :** बेशिस्त वाहन चालकांविरोधात पालघरमध्ये वाहतूक शाखेने नाकाबंदी सुरू केली आहे. यामध्ये ट्रिपल सीट, विनाहेल्मेट, परवाना नसताना वाहन चालवणे, बेदरकार स्टंटबाजी, लेन कटिंग, ओव्हरलोड वाहतूक, कर्कश हॉर्नचा वापर तसेच तर्राट होऊन गाड्या चालवणाऱ्या वाहनचालकांच्या पावत्या फाडून १ कोटी ३२ लाखांचा दंड वसूल करण्यात आला आहे. जानेवारी ते मे अशा चार महिन्यांत आठ हजार सातशे चालकांवर हा कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. अतिवेगाने वाहन चालविण्याच्या १९३ प्रकरणांमध्ये तब्बल ५२ लाख ६० हजार रुपयांच दंड वसूल करण्यात आला. विनाहेल्मेट वाह चालविण्याच्या १२७० जणांवर तर लेन कटिंगच्य ३४७ प्रकरणांत ५ लाख ५० हजार रुपयांचा दंड वसू करण्यात आला. अवैध प्रवासी वाहतुकीच्या १७६, ड्रिंक ॲण्ड ड्राइव्हच्या ९७ तर राँग साइड वाहन चालविण्याच्या ३६४ प्रकरणांची नोंद करण्यात आली आहे.



### खोपोली पोलिसांचा रूट मार्च

**खोपोली :** बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर शहरात शांतता, सामाजिक सलोखा आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी खोपोली शहरासह शिळफाटा परिसरात खोपोली पोलिसांच्या वतीने भव्य रूट मार्च काढण्यात आला. रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली, खालापूर तालुक्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहूल यांच्या नेतृत्वात तसेच खोपोली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांच्या उपस्थितीत हा रूट मार्च पार पडला. खोपोली शहरातील प्रमुख मार्ग, संवेदनशील भाग तसेच शिळफाटा परिसरातून पोलिसांचा ताफा शिस्तबद्ध पद्धतीने फिरविण्यात आला. यावेळी पोलीस अधिकारी, कर्मचारी, वाहन पथक तसेच आवश्यक सुरक्षा यंत्रणा सहभागी झाली होती. बकरी ईदचा सण शांततेत, उत्साहात आणि धार्मिक सौहार्द जपत पार पडावा, यासाठी पोलीस प्रशासनाकडून विशेष दक्षता घेतली जात असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. पोलीस प्रशासनाच्या वतीने नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे, सोशल मीडियावर कोणतीही आक्षेपार्ह किंवा दिशाभूल करणारी माहिती प्रसारित न करण्याचे आवाहन करण्यात आले. रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या सूचनेनुसार जिल्ह्यातील संवेदनशील भागांमध्ये पोलिसांची गस्त वाढविण्यात आली असून, सणाच्या काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस यंत्रणा सतर्क असल्याचा विश्वास प्रशासनाच्यावतीने व्यक्त करण्यात आला.

# निवडक

## विजवितरणाकडून मान्सुनपूर्व कामं सुरु



**रसायनी :** मोहोपाडा विजवितरण कार्यालयाकडून मान्सून पूर्व कामे गेल्या काही दिवस सुरु झाली आहेत. त्यात वृक्ष फांदी छाटणी, रिजम्परिंग, उच्च दाब वाहिनीची दुरुस्ती आणि इतर मेंटेनन्सची सर्व कामे अंतिम टप्प्यात आली आहेत. वीज वितरणाचे अधीक्षक अभियंता बिक्कड, कार्यकारी अभियंता शिंदे, उपकार्यकारी अधिकारी राख यांच्या मार्गदर्शनाखाली मोहोपाडा वीज वितरणाचे उपअभियंता लक्ष्मीकांत लालासाहेब गलांडे पाटील यांच्यावतीने मोहोपाडा परिसरात सुरू आहेत. मोहोपाडासह आसपासच्या परिसरातील फांदी छाटणी, उच्च दाब वाहिनी बदलणे आदी कामे सुरू आहेत. दरम्यान, मोहोपाडा परिसरात नविन ट्रान्स्फार्मं व डिपी बसविण्यासाठी जागा निश्चित करण्यात आली. तसेच श्री गणपती मंदिरामागील परिसरात नव्याने दोन विजपोल बसविण्याचे काम सुरू करण्यात आले. तसेच मोहोपाडा प्रवेशद्वाराजवळील झुकलेला पोल काढणार असून त्याजागी नवीन विजपोल बसविण्यात येत आहे. यावेळी मोहोपाडा विजवितरणाचे उप अभियंता लक्ष्मीकांत गलांडे, लाईनमन शिंदे, राकेश खराडे, प्रदिप पाटील, अमित शहा आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते.

## 'आपडी थापडी' कवितासंग्रहांचे प्रकाशन



**रसायनी :** सर्जनशील पब्लिकेशन व भारत परिवर्तन फाऊंडेशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कवी अंकुश चौरपगार लिखित 'उफान' तसेच कवयित्री अश्विनी अतकरे लिखित 'आपडी थापडी' या कवितासंग्रहांचा प्रकाशन सोहळा आणि राज्यस्तरीय निमंत्रितांचे कवी संमेलन कर्नाटक हॉल येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. याप्रसंगी राज्यभरातील विविध कवी-कवयित्रींनी आपल्या कविता सादर करत सामाजिक, विद्रोही, प्रेम, मानवता आणि परिवर्तनवादी विचारांना स्वर दिला. उपस्थित रसिकांनी कवितांना उत्स्फूर्त प्रतिसाद देत कवींचे स्वागत केले. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. प्रतिभा सराफ, साहित्यिक अविनाश दोंड, चरण जाधव, प्रवीण बोपुलकर, दीपाली घाडगे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोनिका काळे व अमोल चरडे यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन रामदास गायधने, माधवी मोतलिंग व विलास पुंडले यांनी केले होते.

## मंदाकिनी गोळे यांचे निधन



**अलिबाग :** अलिबाग तालुक्यातील मंदाकिनी गोळे यांचे रविवारी (दि.२४) मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ९३ वर्षे होते. त्या अत्यंत मनमिळावू आणि खंबीर स्वभावाच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुली, दोन मुले, सुना, नातवंडे व पतवंडे असा मोठा परिवार आहे. यांचा दशक्रिया विधी मंगळवार, २ जून रोजी श्रीक्षेत्र उद्धर रामेश्वर येथे होणार असून, उत्तरकार्य शुक्रवार, ५ जून रोजी त्यांच्या राहत्या घरी होणार असल्याचे गोळे कुटुंबियांकडून सांगण्यात आले आहे.

## जीवरक्षकांना अधिकृत मान्यता द्या!



**उरण :** तालुक्यातील पिरवाडी समुद्र किनाऱ्यावर दरवर्षी पर्यटक बुडण्याच्या घटना घडत असून, स्थानिक नागरिक आणि जीवरक्षक स्वतःचा जीव धोक्यात घालून पर्यटकांचे प्राण वाचवत असल्याचे गंभीर वास्तव समोर आले आहे. मात्र, कोणतीही शासकीय सुरक्षा, आधुनिक साधने किंवा अधिकृत मान्यता नसताना हे बचावकार्य सुरू असल्याने भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर उरण तालुका मराठी पत्रकार संघाने रायगड जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदन सादर करत पिरवाडी समुद्र किनाऱ्यावर तातडीने सुरक्षा यंत्रणा उभारण्याची मागणी केली आहे.उरण तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष घनःश्याम कडू यांच्या नेतृत्वाखाली निवेदन सादर करण्यात आले. याशिवाय पिरवाडी समुद्र किनाऱ्यावर कायमस्वरूपी सुरक्षा यंत्रणा उभारण्यात यावी, प्रशिक्षित जीवरक्षकांची नियुक्ती करण्यात यावी आणि पर्यटकांच्या सुरक्षेसाठी नियमित नियंत्रण व्यवस्था सुरू करण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.या निवेदनाच्या प्रती तहसीलदार उरण तसेच गटविकास अधिकारी, पंचायत समिती उरण यांनाही देण्यात आल्या आहेत. प्रशासनाने तातडीने निर्णय घेतला नाही तर भविष्यात एखादी मोठी दुर्घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनावर राहील, असा इशाराही स्थानिक नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे.

## पोटनिवडणूक बिनविरोध निवडीचे संकेत

**पोलादपूर:**नगरपंचायत पोलादपूरच्या प्रभाग १ च्या नगरसेविका व माजी नगराध्यक्षा सुनिता पार्टे यांच्या राजीनाम्यानंतर तब्बल वर्षभर रिक्त राहिलेल्या नगरसेवक पदाची पोटनिवडणूक प्रक्रिया सुरू झाली असून, उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अंतिम मुदतीवेळी दोन सर्वसाधारण महिला उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे दाखल झाली आहेत. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुदतीत यापैकी एक अर्ज मागे घेतला जाण्याची शक्यता अधिक असल्याने बिनविरोध निवडीचे संकेत प्राप्त होत आहेत.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- बोअरवेल/विहिरीसाठी इलेक्ट्रॉनिक मशीनद्वारे भूजल संशोधन व केमिकल ट्रीटमेंट द्वारा जुन्या बोअरवेलचे पाणी वाढवणे.
- jai santoshi maa CNG Alibag wadgav 1) Filler-man 2) Housekeeping Contact No. Shubham Naik - 7774039128, Rohit Pongade - 7498131812
- JOB VACANCY अलिबागमध्ये कामाला कार ड्रायव्हर हवा आहे. अधिक माहितीसाठी संपर्क करा. ८८०६१८४३०२
- अलिबाग एसटी स्टँन्डजवळ दूकानगाळा विक्री करणे आहे. ९७६४५४८६७९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# आंबेनळी-ताम्हिणी घाट ठरतोय 'मृत्यूचा मार्ग'!

| सलीम शेख |
| माणगाव |

कोकण आणि पुणे परिसराला जोडणारे निसर्गरम्य आंबेनळी आणि ताम्हिणी घाट आज प्रवाशांसाठी अक्षरशः मृत्यूचे सापळे बनत चालले आहेत. हिरव्यागार डोंगररांगा, धबधबे आणि वळणावळणाचे रस्ते यामुळे पर्यटकांना आकर्षित करणारे हे घाट प्रत्यक्षात मात्र जीवघेणे ठरत असल्याचे भीषण वास्तव समोर आले आहे. गेल्या काही वर्षांत या घाटांमध्ये शेकडो अपघात झाले असून, अनेक निष्पाप नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे.

नुकत्याच आंबेनळी घाटातील भीषण अपघातात आठ तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर ताम्हिणी घाटातही अनेकदा मृत्यूचे तांडव पाहायला मिळाले आहे. तरीही प्रशासनाकडून ठोस उपाययोजना होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप

- **निष्काळजी प्रशासनामुळे प्रवाशांचे जीव धोक्यात**
- **शेकडो अपघातांनंतरही उपाययोजना शून्य**

व्यक्त केला जात आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, आंबेनळी आणि ताम्हिणी घाटातील रस्त्यांची अवस्था दिवसेंदिवस अधिक धोकादायक बनत आहे. अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. रस्त्याच्या कडेला संरक्षण कठडे नसल्याने वाहन थेट दरीत कोसळण्याचा धोका कायम असतो. धोकादायक वळणांवर चेतावणी फलकांचा अभाव, रात्री अपुरी प्रकाशयोजना आणि पावसाळ्यात दरड कोसळण्याचा धोका यामुळे या



### प्रशासनाचे दुर्लक्ष

निसर्गसौंदर्यासाठी प्रसिद्ध असलेले आंबेनळी आणि ताम्हिणी घाट आज प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे आणि निष्काळजीपणामुळे मृत्यूचा मार्ग बनत असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत. आणखी किती निष्पाप जीव गेल्यानंतर प्रशासन जागे होणार? असा संतप्त सवाल आता सर्वसामान्यांकडून उपस्थित केला जात आहे.

घाटातून प्रवास करणे म्हणजे जीव मुठीत धरून चालण्यासारखे झाले आहे. विशेषतः मुसळधार पावसाच्या काळात घाटातील रस्ते निसरडे आणि घसरडे बनतात. धुक्यामुळे दृश्यता कमी होते आणि वाहनचालकांचे नियंत्रण सुटल्याने गंभीर अपघात घडतात. दरम्यान, या घाटातून दररोज हजारो पर्यटक, दुचाकीस्वार, मालवाहतूक वाहने आणि एसटी बस प्रवास करतात. मात्र वाढती वाहतूक आणि अरुंद रस्ते यामध्ये योग्य नियोजन नसल्याने वाहतूक कोंडी आणि अपघातांचे प्रमाण सातत्याने वाढत आहे.

काही ठिकाणी रस्त्याची रुंदी इतकी कमी आहे की दोन मोठी वाहने समोरासमोर आल्यास चालकांना अक्षरशः जीव धोक्यात घालून वाहन चालवावे लागते.स्थानिक ग्रामस्थ आणि प्रवासी वारंवार मागणी करत आहेत की आंबेनळी आणि ताम्हिणी घाटात तातडीने मजबूत संरक्षण कठडे उभारावेत, धोकादायक वळणांवर रिफ्लेक्टर आणि चेतावणी फलक बसवावेत, सीसीटीव्ही आणि वेग नियंत्रण यंत्रणा कार्यान्वित करावी, तसेच रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करावी. पावसाळ्याच्या काळात आपत्कालीन बचाव पथके, पोलीस बंदोबस्त आणि रुग्णवाहिका कायमस्वरूपी तैनात ठेवण्याचीही मागणी नागरिकांकडून होत आहे.

# रस्ता नाही तर खुर्च्या खाली करा

| पाताळगंगा | प्रतिनिधी |

खालापूर तालुक्यातील माडप मुठा ठाकूरवाडी येथील रखडलेल्या रस्त्याच्या कामावरून आदिवासी बांधवांचा संताप सोमवारी उफाळून आला. 'रस्ता पूर्ण करा, नाहीतर खुर्च्या खाली करा' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. प्रशासनाने लेखी आश्वासन दिल्यानंतर अखेर आंदोलनाला स्थगिती देण्यात आली.

डोंगराळ भागात वसलेल्या या वाडीत ६०० हून अधिक आदिवासी बांधव वास्तव्यास आहेत. मुख्यमंत्री सडक योजनेतून या रस्त्यासाठी ९ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते मोठ्या गाजावाजात




- **माडप मुठा ठाकूरवाडीत आदिवासींचा संताप**
- **लेखी आश्वासनानंतर आंदोलन स्थगित**

भूमीपूजनही करण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात काम रखडल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली होती.

संतप्त ग्रामस्थांनी चार किलोमीटर डोंगरातून पायपीट करत गावाच्या वेशीजवळ ठिय्या आंदोलन सुरू केले. यावेळी सामुदायिक आत्मदहनाचा इशाराही देण्यात आला. आदिवासी बांधवांसह महिला, तरुण आणि लहान मुलेही आंदोलनात सहभागी झाली होती.

दरम्यान, रस्त्याच्या कामात वन विभागाच्या परवानगीचा मुद्दा पुढे केला जात होता. मात्र वन विभागाकडून कोणतीही अडचण नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर ठेकेदाराच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. त्यामुळे आंदोलन अधिक तीव्र झाले.

अखेर चार तासांच्या आंदोलनानंतर प्रशासनाने तात्काळ काम सुरू करण्याचे लेखी आश्वासन दिले. त्यानंतर ग्रामस्थांनी आंदोलन स्थगित केले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य संतोष बैलमारे, पोलीस निरीक्षक सचिन पवार, उपअभियंता आर.के. चव्हाण, कनिष्ठ अभियंता निकिता गुरव, माजी उपसभापती विश्वनाथ पाटील, सरपंच अर्चना पाटील यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# समृद्ध पंचायत राज अभियानात पाणजे प्रथम

| उरण | प्रतिनिधी |

उरण तालुक्यातील पाणजे ग्रामपंचायतीने विकासाचा दमदार ठसा उमटवत मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानात तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला असून, तब्बल १५ लाख रुपयांच्या बक्षिसावर आपले नाव कोरले आहे. तर जासई ग्रुप ग्रामपंचायतीनेही उल्लेखनीय कामगिरी करत द्वितीय क्रमांक मिळवत १२ लाख रुपयांच्या बक्षिसाचा मान पटकावला आहे. जागर बदलाचा, समृद्ध महाराष्ट्राचा हा मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाचा नारा प्रत्यक्ष कृतीत उतरवत उरण तालुक्यातील या दोन्ही ग्रामपंचायतींनी विकासाचा झेंडा उंचावला आहे. रायगड जिल्हा परिषद अलिबाग आणि पंचायत समिती उरण यांच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या या अभियानात ग्रामविकास, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, प्रशासनातील पारदर्शकता, जनसहभाग, नागरिक सुविधा आणि गावांच्या सर्वांगीण विकासाच्या निकषांवर मूल्यमापन करण्यात आले.

त्यामध्ये पाणजे ग्रामपंचायतीने उत्कृष्ट नियोजन, स्वच्छता मोहिमा, नागरिकाभिमुख उपक्रम आणि गावाच्या विकासासाठी राबविण्यात आलेल्या योजनांच्या जोरावर तालुक्यात अव्वल स्थान पटकावले. गावातील विविध

विकासकामांमुळे पाणजे ग्रामपंचायतीचा ठसा संपूर्ण तालुक्यात उमटला आहे.तर जासई ग्रुप ग्रामपंचायतीनेही विकासाचा ध्यास घेत प्रभावी कामगिरी करत द्वितीय क्रमांक मिळवला. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची दखल घेत जासई ग्रामपंचायतीला हा मान मिळाला आहे.

## वरवठने विभागात विजेचा खेळ खंडोबा

**म्हसळा :** म्हसळा तालुक्यातील वरवठने विभागात असलेल्या कोळे, तळवडे, पानवे, कोंझरी, केलटे, जांभूळ, घुम, रुद्रवट, नेवरूळ, ठाकरोली, कोकबल, सांगवड गावापर्यंत विजेचा खेळखंडोबा सुरू आहे. वीजपुरवठा सतत खंडीत होत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. गेल्या चार ते पाच दिवसांपासून रात्री, दिवस अवेळी वीज सतत खंडित होत आहे. वीज बिलाच्या वसुलीसाठी वीजपुरवठा तोडण्याचा इशारा देणाऱ्या महावितरण मंडळाची सुरळीतपणे वीजपुरवठा करण्याची जबाबदारी नाही का, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित करण्यात आला आहे. पावसाळ्याअभावी आधीपासूनच मे महिन्याच्या सुरवातीला ग्रामीण भागात विजेचा लपंडाव सुरु झाला आहे. कधी तांत्रिक बिघाड तर कधी देखभालीच्या नावाखाली दिवसभरात अनेक तास वीजपुरवठा खंडित करण्यात येत आहे. रात्रीच्या वेळेतही वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने ग्रामीण भाग अंधारात बुडून जात आहे.

# वर्षभरानंतरही नुकसानभरपाई नाही

**कळंबुसरेतील ८० हून अधिक कुटुंबे वंचित**

| उरण | प्रतिनिधी |

उरण तालुक्यातील कळंबुसरे गावावर मागील वर्षी २६ मे रोजी कोसळलेल्या वादळी पावसाच्या संकटाला आज एक वर्ष पूर्ण होत असताना, शासनाच्या कामचुकार धोरणामुळे गावातील तब्बल ८० हून अधिक नुकसानग्रस्त रहिवासी आजही नुकसानभरपाईपासून वंचित असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. नैसर्गिक आपत्तीत संसार उद्ध्वस्त झालेल्या कुटुंबांना अद्याप मदतीची प्रतीक्षा करावी लागत असल्याने ग्रामस्थांमध्ये शासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

२६ मे २०२५ रोजी सकाळी सहाच्या सुमारास अचानक आलेल्या वादळी पावसाने आणि सोसाट्याच्या वाऱ्याने कळंबुसरे गावासह चिरनेर, सारडे आणि वशेणी गावांना अक्षरशः तडाखा दिला होता. या नैसर्गिक आपत्तीत सुमारे १५० हून अधिक घरांचे मोठे नुकसान झाले होते. अनेक घरांची छपरे उडून गेली होती, काही घरांच्या भिंती कोसळल्या होत्या, तर अनेक घरांमध्ये पावसाचे पाणी शिरल्याने संसारोपयोगी वस्तूंचे



मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. घरांचे छप्पर उडाल्यामुळे विद्युत उपकरणे, कपडे, बेड, सोफा, अन्नधान्य आणि इतर जीवनावश्यक वस्तू अक्षरशः पावसात वाहून गेल्या होत्या. या संकटामुळे अनेक कुटुंबांचे संसार उघड्यावर आले होते. त्या वेळी प्रशासनाकडून युद्धपातळीवर पंचनामे करण्यात आले होते. नुकसानग्रस्तांना लवकर मदत मिळेल, अशी आशा निर्माण झाली होती. मात्र एक वर्ष उलटल्यानंतरही कळंबुसरे गावातील सुमारे ८० हून अधिक रहिवाशांना नुकसानभरपाई मिळालेली नाही. शासनाच्या कामचुकार धोरणामुळे आमच्यावर अन्याय झाला आहे. नुकसानग्रस्तांना तात्काळ भरपाई मिळावी, हीच आमची मागणी आहे, असे मनोज पाटील यांनी सांगितले.

# ऑल इंडिया पँथर सेनेच्या पाठपुराव्याला यश

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

सुधागड तालुक्यातील दहीगाव-आमणोली गावाकडे जाणारा मुख्य पूल १३ मे रोजी कोसळला होता. हा पूल तात्काळ दुरुस्त करण्यात यावा याबाबत ऑल इंडिया पँथर सेनेने प्रशासनाला निवेदन देऊन आंदोलनाचा इशारा दिला होता. प्रशासनाने या मागणीची तातडीने दखल घेतली असून, पंचायत समिती सुधागड-पालीच्या वतीने या पुलाचे दुरुस्ती काम युद्धपातळीवर सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

डंपरचा अतिरिक्त भार आल्यामुळे १९९४-९५ मध्ये बांधलेला हा मुख्य पूल कोसळला. हा पूल अनेक गावे, आदिवासी वाड्या, बौद्धवाड्या आणि मुख्य बाजारपेठेला जोडणारा अत्यंत महत्त्वाचा मार्ग होता. पूल कोसळल्यामुळे शाळकरी विद्यार्थी, नोकरदार आणि रुग्णांचे हाल होत होते व संपूर्ण जनजीवन विस्कळीत झाले होते. पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला होता. यावर तोडगा काढण्यासाठी ऑल इंडिया पँथर सेनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष



(छायाचित्र : धम्मशील सावंत)

संदेश भालेराव आणि सुधागड तालुका सेक्रेटरी नितीन गायकवाड यांनी थेट तहसीलदार आणि जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन, तात्काळ पर्यायी मार्ग आणि नवीन पुलाचे बांधकाम न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा व उपोषणाचा इशारा दिला होता.

थर सेनेच्या या आक्रमक पाठपुराव्याची दखल घेत गट विकास अधिकारी लता मोहिते पंचायत समिती सुधागड-पाली यांनी उपअभियंता बांधकाम विभाग, पेण यांना तातडीने अधिकृत पत्र पाठवले. या पत्रात त्यांनी स्पष्ट केले की, दहीगाव आमणोली गावाकडे जाणाऱ्या कोसळलेल्या पुलाची तात्काळ स्थळ पाहणी करून पर्यायी मार्ग मोकळा करण्यात यावा. संदर्भ पत्राचा विचार करून नागरिकांचा हा प्रश्न कायमस्वरूपी सुटावा यासाठी पुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट करून नवीन पुलाचे बांधकाम करण्यात यावे असे पत्रात म्हटले होते.

**पोलादपूर नगरपंचायतीला राष्ट्रीय हरित लवादाची नोटीस | घनकचऱ्या विरोधात दोन वेळा आंदोलन**

# सावित्री नदी पुन्हा कचऱ्याच्या विळख्यात!

| पोलादपूर | प्रतिनिधी |

सावित्री नदीपात्रात अनधिकृतपणे घनकचरा टाकल्याप्रकरणी पोलादपूर नगरपंचायतीला राष्ट्रीय हरित लवादाकडून पुन्हा नोटीस बजावण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यातील 'सत्कार ग्रामीण फाऊंडेशन' या संस्थेने दाखल केलेल्या याचिकेवरून हरित लवादाने ही गंभीर दखल घेतली असून, पोलादपूर नगरपंचायत, तहसील कार्यालय आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले आहेत.

विशेष म्हणजे, यापूर्वीही २०२१ मध्ये पोलादपूर स्मशानभूमीलगत साठवलेला कचरा पूरकाळात सावित्री नदीत सोडल्याप्रकरणी नगरपंचायतीवर तब्बल सात लाख रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली होती. तरी देखील प्रशासनाने धडा न घेतल्याचा आरोप पर्यावरणप्रेमींकडून केला जात आहे.



• (छायाचित्र : शैलेश पालकर)

सत्कार ग्रामीण फाऊंडेशनच्या तक्रारीनुसार, पोलादपूर शहरातील घनकचरा कोणतीही प्रक्रिया न करता थेट सावित्री नदीपात्रात टाकला जात आहे. त्यामुळे नदीचे पाणी प्रदूषित होत असून, पर्यावरणासह नागरिकांच्या आरोग्यालाही गंभीर धोका निर्माण झाला आहे. संस्थेने छायाचित्रे, स्थानिकांच्या तक्रारी आणि संबंधित कागदपत्रांसह राष्ट्रीय हरित लवादाकडे धाव घेतली होती.

सावित्री नदीलगत अनेक गावांच्या पाणीपुरवठा योजना कार्यरत आहेत. अशा परिस्थितीत नदीपात्रात कचरा टाकल्याने नागरिकांना दूषित पाणी पिण्याची वेळ येत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. यापूर्वी स्मशानभूमीलगतचा कचरा पूरकाळात नदीत वाहून गेल्याने नगरपंचायतीवर दंडात्मक कारवाई झाली होती. मात्र, आता सावित्री आणि चोळई नदीच्या संगमावरील दगडगोट्यांवर पुन्हा शहरातील कचरा टाकण्याचा प्रकार सुरू असल्याने पर्यावरणप्रेमींमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

दरम्यान, गेल्या महिन्यात 'आमची माती आमची माणसं' या सामाजिक संघटनेने सावित्री-चोळई संगमावरील घनकचऱ्याविरोधात दोन वेळा आंदोलन केले होते. आता राष्ट्रीय हरित लवादाच्या नोटीसीनंतर नगरपंचायत प्रशासन कोणती भूमिका घेणार, याकडे सर्व पोलादपूरकरांचे लक्ष लागले आहे.

घरपट्टीवाढीच्या संकटात नागरिकांना ढकलून, त्याच नागरिकांच्या पैशातून हरित लवादाचे दंड भरावे लागत असल्याने नगरपंचायत प्रशासनाविरोधात नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

# निवडक

## आयपीएलचे वेळापत्रक बदलणार

**नवी दिल्ली :** आयपीएलचे अध्यक्ष अरुण धुमल यांनी सांगितले की, भारतीय उन्हाळ्यातील तीव्र उष्णता आणि त्यामुळे येणाऱ्या थकव्यामुळे आयपीएल सध्याच्या मार्च-मे महिन्याऐवजी सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये आयोजित करण्याचा विचार करावा लागू शकतो. ही स्पर्धा तिच्या सुरुवातीपासून एप्रिल-मे, या दोन महिन्यांच्या कालावधीत आयोजित केली जात आहे. परंतु, आयपीएल २०२८ पासून सामन्यांची संख्या वाढवण्याची योजना आखत असल्याने, लीगला कॅलेंडरमधील वेगळ्या कालावधीत हलवल्यास ते अधिक फायदेशीर ठरेल का, असा प्रश्न आता बीसीसीआयसमोर उपस्थित झाला आहे. धुमाल म्हणाले की, स्पर्धेचे वेळापत्रक बदलण्याची कोणतीही तातडीची गरज नाही, मात्र ते बदलण्याचा कोणताही निर्णय प्रसारकाशी सल्लामसलत करूनच घ्यावा लागेल.दरवर्षी मे महिन्यात वाढणारी उष्णता ही एक वाढती चिंता बनत असून, त्याचा परिणाम स्टेडियममधील उपस्थितीवर होत आहे. उष्णतेमुळे खेळाडूंच्या दुखापती आणि तंदुरुस्तीबद्दलही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. त्यामुळे आयपीएलचे वेळापत्रक बदलण्याबद्दल चर्चा वाढत आहे. शिवाय, बीसीसीआय, ही स्पर्धा दोन भागांमध्ये आयोजित करण्याच्या पर्यायाचाही विचार करत आहे.




## धोनी आता प्रशिक्षकाच्या भूमिकेत?

**नवी दिल्ली :** यंदाचा आयपीएल हंगाम सुरू होण्यापूर्वीच गुडघ्याच्या दुखापतीमुळे एमएस धोनीला संपूर्ण हंगामातून बाहेर राहावे लागले. त्यामुळे चाहत्यांना यंदाच्या मोसमात धोनीला पिवळ्या जर्सीत मैदानात पाहता आले नाही. त्यानंतर धोनी आयपीएलमधून निवृत्ती घेणार का, याबाबत चर्चांना उधाण आले होते. मात्र, चेन्नई सुपर किंग्जचे मुख्य कार्यकारी अधिकारी काशी विश्वनाथन यांनी धोनीबाबत मोठे वक्तव्य केले आहे. एका मुलाखतीत बोलताना काशी विश्वनाथन म्हणाले की, ''धोनी कोणत्याही भूमिकेत असला तरी तो सीएसकेसोबत कायम जोडलेला राहावा, अशी आमची इच्छा आहे. खेळाडू, प्रशिक्षक किंवा मार्गदर्शक, कोणतीही भूमिका असो, अंतिम निर्णय मात्र धोनीचाच असेल.'' धोनीनंतर चेन्नईची धुरा ऋतुराज गायकवाड याच्याकडे सोपवण्यात आली. मात्र, त्याच्या नेतृत्वाखाली संघाला अपेक्षित यश मिळाले नाही. त्यामुळे पुढील हंगामात धोनी चेन्नईच्या प्रशिक्षकाच्या भूमिकेत दिसणार का, अशी चर्चा जोर धरत आहे.



## विजय शंकर परदेशी लीग खेळणार

**नवी दिल्ली :** ऑलराउंडर विजय शंकरने लंका प्रीमियर लीग मध्ये खेळण्याचा निर्णय घेतला आहे. त्याने नुकतीच देशांतर्गत क्रिकेट आणि आयपीएलमधून निवृत्ती घेतली होती. त्याला एलपीएलमध्ये कॅन्डी रॉयल्सच्या संघाने करारबद्ध केले आहे. विजय शंकर भारतासाठी कसोटी आणि एकदिवसीय स्वरूपात खेळला होता. परंतु, तिथे त्याला जास्त संधी मिळाल्या नाहीत. अशा परिस्थितीत त्याने वयाच्या अवघ्या ३५ व्या वर्षी निवृत्ती घेतली. यासोबतच तो आयपीएलमध्ये ४ संघांसाठी खेळला आहे. विजय शंकर लंका प्रीमियर लीगमध्ये सामील झाल्याची माहिती एलपीएलने आपल्या सोशल मीडियाच्या माध्यमातून दिली आहे. यासाठी त्यांनी ट्विटरवर एक व्हिडिओ शेअर केला आहे. त्यामध्ये त्यांनी सांगितले आहे की, तो आगामी एलपीएल हंगामात कॅन्डी रॉयल्ससोबत जोडला जात आहे. तुम्हाला सांगतो की, लंका प्रीमियर लीगची सुरुवात दि.१७ जुलैपासून होणार आहे. या स्पर्धेची ही सहावी आवृत्ती असेल. या हंगामासाठी कॅन्डी रॉयल्सने वनिंदू हसरंगा आणि मोईन अली यांना आयकॉन खेळाडू म्हणून करारबद्ध केले आहे. तर, अँजेलो मॅथ्यूज आणि विजय शंकर स्टार खेळाडू म्हणून संघासोबत जोडले गेले आहेत.




## भारतीय खेळाडूंची विजयी सलामी

**सिंगापूर :** पी. व्ही. सिंधू हिने महिला एकेरीत आणि सात्त्विक साईराज रंकीरेड्डी-चिराग शेट्टी जोडीने पुरुषांच्या दुहेरीत प्रतिस्पर्धी खेळाडूंना पराभूत करीत सिंगापूर ओपन या बॅडमिंटन स्पर्धेत विजयी सलामी दिली आहे. भारताच्या इतर खेळाडूंना मात्र मंगळवारी (दि.२६) पराभवाचा सामना करावा लागला. पी. व्ही. सिंधू हिने या स्पर्धेतील पाचवी मानांकित इंडोनेशियाच्या पुत्री कुसुमा वरदानी हिला २१-१७, २१-१८ असे सहज दोन डावांमध्ये पराभूत केले. पहिल्या डावात पी. व्ही. सिंधूने ४ गुणांची आघाडी मिळवली. मात्र, त्यानंतर इंडोनेशियाच्या खेळाडूने पुनरागमन करताना बरोबरी साधली. भारताच्या खेळाडूने १६-१६ अशी बरोबरी साधली. पी.व्ही. सिंधूने सलग ५ गुण मिळवत पहिला डाव २१-१७ असा जिंकला. त्यानंतर पी.व्ही. सिंधूने निर्णायक क्षणी आपला खेळ उंचावत २१-१८ असे यश मिळवले. त्यानंतर सात्त्विक साईराज रंकीरेड्डी-चिराग शेट्टी या जोडीला विजयासाठी संघर्ष करावा लागला. भारतीय जोडीला १ तास व १५ मिनिटांच्या संघर्षानंतर विजय प्राप्त झाला. सात्त्विक साईराज रंकीरेड्डी - चिराग शेट्टी या जोडीने ली हुई-यांग सुयान या चीन तैपईच्या जोडीवर तीन डावामध्ये रोमहर्षक विजय मिळवला.



# गुजरात टायटन्सचा लाजीरवाणा पराभव

## बंगळुरूची थेट अंतिम सामन्यात धडक




**। धर्मशाला । वृत्तसंस्था ।**

गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने आयपीएलच्या अंतिम सामन्यात थेट धडक मारली आहे. गुजरात टायटन्सला सर्व आघाड्यांवर चीतपट करताना आरसीबीने जेतेपद कायम राखण्याच्या दिशेने वाटचाल केली आहे. मंगळवारी (दि.२६) धर्मशालेत खेळवल्या गेलेल्या क्वालिफायर-१ सामन्यात बंगळुरूने गुजरातवर ९२ धावांनी विजय मिळवला आहे. त्यामुळे आता गुजरातला क्वालिफायर २ मध्ये खेळावे लागणार आहे. एलिमिनेटरमधील सनरायझर्स हैदराबाद विरुद्ध राजस्थान रॉयल्स यांच्यातल्या विजेत्यांशी ते भिडतील.

गुजरात टायटन्सचा कर्णधार शुबमन गिलने नाणेफेक जिंकत प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. विराट कोहलीने ४३ धावा करत संघाला उत्तम सुरूवात करून दिली. यावेळी कोहली आणि देवदत्त पडिक्कल (३०) यांनी ७२ धावांची भागीदारी केली होती. त्यानंतर मधल्या फळीत रजत पाटीदारने फलंदाजीला येत संपूर्ण सामन्याचे चित्रच पालटले. त्याने कर्णधारपदाला साजेशी खेळी करत संघाला २५४ धावांची मोठी धावसंख्या उभारण्यात महत्त्वाची कामगिरी बजावली. त्याने ३३ चेंडूंत नाबाद ९३ धावा केल्या. त्याला कृणाल पांड्यानेही चांगली साथ दिली. दोघांनी चौथ्या बळीसाठी ९५ (४५) धावांची भागीदारी केली. कृणाल ४३ धावा करत बाद झाला. यावेळी रबाडा, होल्डर यांनी प्रत्येकी २, तर प्रसिद्ध कृष्णाने १ बळी घेतला.

लक्ष्याचा पाठलाग करण्यास उतरलेल्या गुजरातच्या फलंदाजांनी निराशा केली. साई सुदर्शन १४ धावांवर हिट विकेट पडला आणि गिलही २ धावांवर त्रिफळाचीत झाला. यष्टीरक्षक जोस बटलरने ११ चेंडूंत २९ धावा केल्या. निशांत सिंधू ५ धावांवर आणि वॉशिंग्टन सुंदर ८ धावांवर बाद झाले. जेसन होल्डर तर शून्यावरच बाद झाला. संघ बिकट स्थितीत असताना राहुल तेवातियाने अर्धशतक झळकावून गुजरातचा धावफलत हलता ठेवला; मात्र, शेवटी गुजरातला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. यावेळी बंगळूरूकडून वेगवान गोलंदाज जेकब डफीने सर्वाधिक ३ बळी घेतले. तसेच, रसिक सलाम दार, कृणाल पांड्या आणि भुवनेश्वर कुमार यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.

### जीवदान अन् सर्वोच्च धावसंख्या

या सामन्यात गुजराजच्या पराभवाचे सर्वात मोठे कारण त्यांचे क्षेत्ररक्षण ठरले. त्यांनी बंगळुरूचा कर्णधार रजत पाटीदारला दोनदा जीवनदान दिले. १४ व्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर प्रसिद्ध कृष्णाने टाकलेल्या चेंडूवर रजत १८ धावांवर असताना त्याचा झेल सोडला. त्यानंतर त्याच षटकातीलच तिसऱ्या चेंडूवर पुन्हा एकदा रजतला जीवनदान मिळाले. कगिसो रबाडाने रजतचा सोपा झेल सोडला आणि तेव्हा गिल खूपच चिडलेला दिसला. त्यानंतर रजतने अवघ्या २१ चेंडूंत अर्धशतक ठोकले. रजत पाटीदारने ३३ चेंडूंत ५ चौकार व ९ षटकारांसह ९३ धावांची नाबाद खेळी केली. त्याच्या या खेळीने क्वालिफायर सामन्यात संघाला सर्वोच्च धावसंख्या उभारून दिली.



● अलिबाग लेदर प्रीमियर लिगचा अंतिम सामना बुधवारी (दि.२७) पार पडला. या अंतिम सामन्यात युव्ही स्पोर्ट्स अलिबाग विरूद्ध सिया अँड श्रियान वॉरियर्स नागाव यांच्यात लढत झाली. यावेळी युव्ही स्पोर्ट्स संघाने बाजी मारत लेदर प्रीमियर लिग चषकावर आपले नाव कोरले. त्यामुळे सिया अँड श्रियान वॉरियर्स संघाला द्वितीय स्थानावर समाधान मानावे लागले. यावेळी विजेत्या संघांना व उत्कृष्ट खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

## आयपीएल विरूद्ध काउंटी वाद



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आयपीएल आणि इंग्लंडच्या काउंटी क्रिकेट चर्चेत आता ऑस्ट्रेलियाच्या माजी वेगवान गोलंदाजाने उडी घेतली आहे. ही चर्चा इंग्लंडचा माजी कर्णधार ऍलिस्टर कूकमुळे सुरू झाली. त्याने सुचवले की, युवा फलंदाज जेकब बेथेलने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा संघ सोडून काउंटी क्रिकेट खेळावे. त्यामुळे त्याला इंग्लंडच्या संघाशी जोडण्याआधी पुरेसा खेळण्याचा वेळ मिळेल. आरसीबीने जेव्हा बेथेलला अंतिम अकरामध्ये घेतले नाही आणि बेंचवर बसविले, तेव्हा कूकने हे वक्तव्य केले होते.

आरसीबीने हंगामाच्या सुरूवातीच्या काही सामन्यांमध्ये डावाची सुरूवात करण्यासाठी विराट कोहलीसोबत फिल सॉल्टला निवडले, त्यामुळे बेथेल अनेक सामने बाकावर बसून राहिला. हे पाहून कूकने त्याला इंग्लंडमध्ये परत येऊन काउंटी क्रिकेट खेळावे, असा सल्ला दिला होता. त्यामध्ये इंग्लंडचा माजी कर्णधार केविन पीटरसनने हस्तक्षेप केला. बेथेल केवळ आरसीबी संघात सामील झाल्यामुळे मौल्यवान अनुभव मिळवत आहे, असे मत पीटरसनने मांडले होते. ''ऍलिस्टर कूकला आयपीएलमध्ये खेळण्याचा अनुभव कसा असतो याची अजिबात कल्पना नाही. जेकब, भारतातच राहा. जरी तू खेळत नसलास तरी, तू शिकत आहेस आणि एक खूप चांगला खेळाडू बनशील'', असे पीटरसनने एक्सवर लिहिले होते. या चर्चेबाबत ऑस्ट्रेलियाचे दिग्गज ग्लेन मॅकग्रा आणि डॅमियन फ्लेमिंग बोलताना जेसन गिलेस्पी यांनी आपले विचार मांडले. ते म्हणाले, ''सर ऍलिस्टर कूकने यांनी असे काही सुचवण्याच धाडस कसे केले. केपीने तर कहरच केला आहे आणि असे म्हटले आहे की, सर ऍलिस्टर कूक यांच्या मताला काही महत्त्व नाही, कारण ते कधीही आयपीएलमध्ये खेळले नाहीत आणि त्यांना काय माहित असेल. मला वाटते कूक यांचा मुद्दा योग्य होता, असे जेसन गिलेस्पी म्हणाले.

## न्यूझीलंडच्या खेळाडूंचा विश्वविक्रम

**नवी दिल्ली :** न्यूझीलंडचा संघ एकमेव कसोटी सामन्यासाठी आयर्लंड दौऱ्यावर पोहोचला आहे. मात्र, या सामन्यात केन विलियम्सन आणि टॉम लॅथम हे १२ वेगवेगळ्या देशांमध्ये कसोटी सामना खेळणारे पहिले दोन खेळाडू बनले आहेत. या दोघांसाठीही आयर्लंडमधील हा पहिलाच कसोटी सामना असून, या जोडीने भारत, पाकिस्तान, श्रीलंका, बांगलादेश, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, वेस्ट इंडिज, युएई आणि झिम्बाब्वे या देशांमध्ये न्यूझीलंडसाठी किमान एक कसोटी सामना खेळला आहे.

## सुर्यकुमार अगामी मालिकेसाठी सज्ज

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताचा टी-२० कर्णधार सूर्यकुमार यादव याला आयपीएलमध्ये साजेशी कामगिरी करता आलेली नाही. आता तो आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्धच्या मालिकेसाठी तयारीला लागला आहे; परंतु, त्याआधी तो दि.३० मे रोजी युगांडा संघाविरुद्ध ट्रायम्फ नाइट्स मुंबई नॉर्थ ईस्ट संघाकडून टी-२० सामन्यात खेळण्यासाठी सज्ज झाला आहे. टी-२० मुंबई लीगच्या नवीन हंगामापूर्वी सुर्यकुमार यादवला एक महत्त्वपूर्ण संधी मिळेल. युगांडाचा संघ सध्या



४ एकदिवसीय आणि ४ टी-२० सामन्यांच्या मालिकेसाठी मुंबईत येणार आहे. त्यांचा सामना दि.१ जूनपासून सुरू होणाऱ्या टी-२० मुंबई लीगमधील ४ वेगवेगळ्या संघांशी होणार आहे. मुंबई क्रिकेट असोसिएशन आणि क्रिकेट युगांडा यांच्यात ५ वर्षांचा सामंजस्य करार करण्यात आला आहे. सूर्यकुमार यादव संघाचाच एक भाग आहे, त्यामुळे तो खेळण्याची शक्यता आहे, असे एमसीएचे सचिव उन्मेश खानविलकर यांनी मंगळवारी येथे क्रिकेट युगांडासोबत पाच वर्षांच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाल्याच्या घोषणेवेळी पत्रकारांना सांगितले. तो भारतीय कर्णधार आहे आणि जेव्हाही तो कोणत्याही संघाविरुद्ध खेळतो, तेव्हा कोणत्याही संघाचे मनोधैर्य वाढते आणि हा एक चांगला क्रिकेट अनुभव असणार आहे, असे खानविलकर पुढे म्हणाले.

## क्रीडा क्षेत्रात पारदर्शकतेचा नारा

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।


क्रीडा क्षेत्र भ्रष्टाचारापासून मुक्त व्हावे, सर्व व्यवहार पारदर्शक असायला हवेत, यासाठी केंद्रीय क्रीडा मंत्रालयाकडून पाऊल उचलण्यात आले आहे. क्रीडा मंत्रालयाने मंगळवारी (दि.२६) नव्याने स्थापन होणाऱ्या राष्ट्रीय स्पोर्ट्स ट्रिब्युनल आणि राष्ट्रीय स्पोर्ट्स बोर्ड यांच्या कामकाजाचे नियम जाहीर केले आहेत. तसेच, क्रीडासंबंधी वाद आणि कायदेशीर नोंदींसाठी केंद्र सरकार एक स्वतंत्र ऑनलाइन पोर्टल सुरू करण्यात येणार आहे. हे दोन्ही संस्थात्मक बदल गेल्या वर्षी मंजूर झालेल्या राष्ट्रीय क्रीडा प्रशासन कायदा अंतर्गत करण्यात येत आहेत. मंत्रालयाने सांगितले की, कॅबिनेट सचिवांच्या नेतृत्वाखाली निवड समिती तयार करण्याची प्रक्रिया सुरू आहे. राष्ट्रीय स्पोर्ट्स बोर्ड ही समिती राष्ट्रीय क्रीडा संघटनांना मान्यता देण्याचे काम करेल.

तसेच, त्यांच्या प्रशासन, आर्थिक व्यवहार आणि नैतिक नियमांचे पालन होत आहे का, यावर देखरेख ठेवेल. या समितीत एक अध्यक्ष आणि दोन सदस्य असतील. त्यांचा कार्यकाळ तीन वर्षांचा असेल. सदस्यांसाठी कमाल वयोमर्यादा ६५ वर्षे ठेवण्यात आली आहे.

## अफगाणिस्तानचे दोन्ही संघ जाहिर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

अफगाणिस्तान क्रिकेट बोर्डाने भारताविरुद्धच्या एकमेव कसोटी व ३ एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेसाठी संघ जाहीर केला. हश्मतुल्लाह शाहिदीच्या नेतृत्वाखाली हे दोन्ही संघ शुभमन गिलच्या संघाला टक्कर देण्यासाठी खेळणार आहेत. दि.६ जून ते २० जून या कालावधीत हा दौरा पार पडणार आहे. तसेच, राशिद खानचा समावेश संघात करण्यात आला असून, तो एकदिवसीय मालिकेत खेळणार आहे. अफगाणिस्तानच्या कसोटी संघात हश्मतुल्लाह शाहिदी (कर्णधार), अब्दुल मलिक, सेदिकुल्लाह अटल, रहमत शाह, रहमनुल्लाह गुर्बाज, रहमनुल्लाह झाद्रान, अफसर




झझाई, इकराम अलिखिल, आझमतुल्लाह ओमारजाई, शराफुदीन अश्रफ, नानग्याल खारोताई, कैस अहमदअ बिलाल सामी, झिआ शरिफी, सलीम सफी, बहिर शाह, इस्मत आलम यांचा समावेश आहे. एकदिवसीय संघात हश्मतुल्लाह शाहिदी हाच कर्णधार असून, रहमनुल्लाह गुर्बाज, इब्राहिम झाद्रान, सेदिकुल्लाह अटल, डारविश रसूली, रहमत शाह, इकराम अलिखिल, मोहम्मद नबी, आझमतुल्लाह ओमारजाई, राशिद खान, नानग्याल खारोताई, अल्लाह गझनफर, जिया रहमान शरिफी, फरीद मलिक, बिलाल सामी, कैस अहमद, सलीम सफी, बशीर अहमद यांचा समावेश आहे.

अजिंक्यपद खो-खो स्पर्धेचा थरार | दोन्ही गटातील संघांचा दमदार विजय

# शिवेनरी, ओम साईश्वरला अजिंक्यपद

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई खो-खो संघटनेच्या मान्यतेने कुमार-कुमारी मुंबई जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा मुंबईतील माटुंगा येथील ओम समर्थ भारत व्यायाम मंदिरच्या क्रीडांगणावर मोठ्या उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात शिवनेरी सेवा मंडळ आणि ओम साईश्वर सेवा मंडळ यांनी आपला दबदबा सिद्ध करत अजिंक्यपदावर नाव कोरले.




या खो-खो स्पर्धेच्या अंतिम दिवशी रंगलेल्या सामन्यांनी प्रेक्षकांना अक्षरशः खिळवून ठेवले होते. कुमारी गटाच्या अंतिम सामन्यात शिवनेरी सेवा मंडळाने श्री समर्थ व्यायाम मंदिरचा ४-३ असा धुव्वा उडवत अजिंक्यपद मिळवले. शिवनेरीने संपूर्ण सामन्यावर वर्चस्व राखत श्री समर्थला पुनरागमनाची संधीच दिली नाही. शिवनेरीच्या आरुषी गुप्ता, मुस्कान शेख, सिद्धी शिंदे, त्रिशा गुप्ता, गार्गी काडगे यांनी संघाला दणदणीत विजय मिळवून दिला.

कुमार गटाच्या अंतिम सामन्यात ओम साईश्वर सेवा मंडळाने सरस्वती स्पोर्ट्स क्लबचा १०-९ असा १पराभव करत अजिंक्यपदावर नाव कोरले. ओम साईश्वर सेवा मंडळाने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ करत आम्हीच बॉस असल्याचे दाखवून देत सलग दुसऱ्या वर्षी अजिंक्यपदाला गवसणी घातली. ओम साईश्वरच्या प्रशिक मोरे, निषाद ताम्हणकर, सार्थक माडीये, अधिराज गुरव, आयुष जाधव व आदित्य राणे यांनी संघाला अजिंक्यपद मिळवून देताना दमदार कामगिरी केली.

दरम्यान, कुमारी गटातील तृतीय क्रमांकाच्या सामन्यात ओम साईश्वर सेवा मंडळाने ओम समर्थ भारत व्यायाम मंदिरचा ५-३ असा पराभव केला. तर, कुमार गटातील तृतीय क्रमांकाच्या सामन्यात श्री समर्थ व्यायाम मंदिराने विद्यार्थी क्रीडा केंद्रचा ४-३ असा पराभव करत तिसरे स्थान पटकावले. या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू आणि प्रशिक्षकांचा गौरव महाराष्ट्र क्रीडा विकास फाऊंडेशनतर्फे करण्यात आला. कै. वि. वि. करमकर यांच्या स्मरणार्थ प्रशिक्षक राकेश कदम (शिवनेरी मुली गट) आणि भूपेश गायकवाड (ओम साईश्वर कुमार गट) यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

## लखनऊ संघात बदल होण्याची शक्यता

**नवी दिल्ली :** यंदाच्या आयपीएलमध्ये लखनऊला १४ सामन्यांत फक्त ४ विजय मिळवता आले असून, गुणतालिकेत तळाशी राहावे लागले. पंतच्या नेतृत्वाखाली संघाला पुन्हा एकदा अपयशाचे तोंड पाहावे लागल्यामुळे मालक संजीव गोएंका संघरचनेत काही बदल करण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पहिल्या दोन वर्षांत संघ प्लेऑफसाठी पात्र ठरला होता, त्यानंतर संघाची घसरण सुरू झाली आहे. त्याची सुरुवात २०२३ च्या हंगामानंतर अँडी फ्लॉवर आणि गौतम गंभीर यांनी संघाचे मुख्य प्रशिक्षक आणि मार्गदर्शक म्हणून पद सोडल्यानंतर झाली आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, आॅर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)